दैनिक

# समर्थ राजयोग

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

SAMARTH RAJYOG

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ६ वे अंक –१६९ | रविवार दि.२२ फेब्रुवारी २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-169 | Sunday, Dt.22 February 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4


# जालना हादरलं विकास की देहव्यापार

## प्रशासनाच्या नाकाखाली मानवी तस्करीचा बाजार
## लोकप्रतिनिधींच्या मौनावर जनतेचा संताप

**जालना / शेख फारुक**
**विशेष वृत्तांत**

**जालना शहराच्या मध्यवर्ती भागात जिथे सुसंस्कृतपणाचा मुखवटा घालून प्रशासन वावरते तिथेच माणुसकीला काळिमा फासणारा देहव्यापाराचा धंदा वर्षानुवर्षे फुल्ल फॉर्म मध्ये सुरू असल्याचे उघड झाले आहे. बसस्टँड रोडवरील वैष्णवी आणि मोक्ष लॉजवर पोलिसांनी मारलेल्या छाप्याने केवळ ७ आरोपींना अटक केलेली नाही तर जालना प्रशासनाचे आणि स्थानिक लोकप्रतिनिधींचे आंधळेपण जगासमोर मांडले आहे.**

राजकीय वरदहस्त की प्रशासकीय निकम्मापणा ?

शहराच्या वर्दळीच्या ठिकाणी जिथून रोज हजारो लोक आणि शेकडो अधिकारी ये–जा करतात तिथे राजस्थान,पश्चिम बंगाल आणि आसाम येथील महिलांना फसवून आणले जाते त्यांच्याकडून देहव्यापार करून घेतला जातो हे वास्तव अंगावर काटा आणणारे आहे.

सामान्य माणसाने घराचे छप्पर बदलले तरी नोटीस धाडणारी महापालिका आणि आरोग्य विभाग,शेकडो महिलांच्या शोषणाकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष कसे काय करू शकते ? असा संतप्त सवाल आता शहरातील सुजाण नागरिक विचारत आहेत.






पोलिसांची धडक कारवाई पण यंत्रणांचे काय ?

जालना पोलिसांनी १३ पीडित महिलांची सुटका करून मोठे धाडस दाखवले असले तरी इतर सरकारी विभागांचे अस्तित्व केवळ कागदावरच उरले आहे का ? असा प्रश्न उपस्थित होत आहे.महिला व बाल विकास विभाग या विभागाला तस्करीच्या सावल्या का दिसल्या नाहीत ? सामाजिक कल्याण विभाग समाजातील या कुप्रथेवर कारवाई करण्यासाठी मुहूर्त कधी निघणार ?

महापालिका प्रशासन लॉजच्या नावाखाली चालणाऱ्या या काळ्या गोदामांना अभय कोणाचे ?

### आता तरी जाग येईल का.. ?

पोलिसांच्या एका छाप्याने सत्ताधाऱ्यांची आणि प्रशासनाची पोलखोल केली असली तरी हा केवळ हिमनगाचे टोक आहे.अशा किती लॉजमध्ये आजही अंधार कोठड्या सुरू आहेत याचा शोध घेणे गरजेचे आहे.जालन्याला देहव्यापाराचे केंद्र बनायचे आहे की सुरक्षित शहर याचे उत्तर आता प्रशासनाला आणि मौन पाळणाऱ्या लोकप्रतिनिधींना द्यावेच लागेल.

तसेच परराज्यातून महिलांची तस्करी होत असताना स्थानिक गुप्तचर विभाग काय करत होता ?मानवी तस्करी प्रतिबंधक कायद्याची १९५६ कडक अंमलबजावणी केवळ कागदावरच का ?या रॅकेटचे मुख्य सूत्रधार राजकीय आश्रयाने पुन्हा मोकळे फिरणार का ? असा संतप्त सवाल सामान्य जनतेतून उपस्थित होत आहे.

### लोकप्रतिनिधींचे सोयीस्कर मौन...

निवडणुकीच्या काळात आमचा जालना सुंदर जालना म्हणणारे आमदार,खासदार आणि नगरसेवक आज तोंडात मिठाची गुळणी धरून का बसले आहेत ? शहराचा विकास म्हणजे केवळ सिमेंटचे रस्ते नव्हेत तर सुरक्षित समाजही असतो.मात्र शहराच्या काळजात सुरू असलेल्या या मानवी तस्करीच्या रॅकेटवर एक शब्दही न बोलणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या भूमिकेमुळे या अड्ड्यांना राजकीय संरक्षण आहे का ? या संशयाला आता बळकटी मिळत आहे.

---

## आष्टी– ब्रम्हगाव रोडलगत उभ्या ग्रैंड व्हिटारा कारमध्ये

## २ घावटी पिस्तूलसह दोघांना घेतले ताब्यात,१ जण फरार

बीड ।प्रतिनिधी

आष्टी–ब्रम्हगाव रोडलगत पांढरी शिवार येथील हॉटेल जय भवानी समोर पांढऱ्या रंगाची ग्रैंड व्हिटारा कार क्र. २५इक९११८– ही संशयास्पद स्थितीत आढळून आली. सदर वाहनाची पोलिसांनी पाहणी केली असता वाहनामध्ये तीन इसम आढळले. पोलीसांनी स्वतःची ओळख देऊन त्यांना खाली उतरविले. तपासणी दरम्यान वाहनातील एका काळ्या रंगाच्या बॅगेची पंचासमक्ष झडती घेतली असता त्यामध्ये पुढील प्रमाणे बेकायदेशीर अग्नीशस्त्र मिळून आली १. एक काळ्या रंगाची गावठी पिस्टल (कट्टा) – अंदाजे किंमत ५०,०००/– २. एक काळ्या रंगाची गावठी पिस्टल (कट्टा) (मॅगझीनसह) अंदाजे किंमत ५०,०००/– एकूण मुद्देमाल किंमत अंदाजे १,००,०००/–दरम्यान, वाहन चालक दत्ता महादेव पोकळे रा. मुगगाव ता. पाटोदा हा वाहन घेऊन घटनास्थळावरून पळुन गेला असून सदर वाहन हे मुगगाव परिसारात सोडुन पसार झाला आहे. सदरचे वाहन त्याचदिवशी पोलीसांमार्फत शोध घेऊन जप्त केले आहे. सदर फरार इसमाचा शोध सुरू आहे.

दि. १९/०२/२०२६ रोजी सार्वजनिक शिवजयंती उत्सव २०२६ निमित्त कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आष्टी पोलीस स्टेशन हद्दीत नियमित पेट्रोलिंग सुरू होती. सदर पेट्रोलिंग दरम्यान पोलीस निरीक्षक शरद भुतेकर यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली की, ब्रम्हगाव परिसरात काही अनोळखी इसम पांढऱ्या रंगाच्या चारचाकी वाहनातून पिस्टलसह फिरत आहेत. त्यानुसार पोलीस निरीक्षक यांनी संबंधित इसमांचा व गाडीचा शोध घेण्याचे आदेश पोलीस ठाणे आष्टी येथील पोलीस स्टाफला दिले. त्या अनुषंगाने पोलीस स्टाफ डायल ११२ वाहनाने ब्रम्हगावकडे रवाना झाले. रात्री सुमारे २०.५० वा. सदर घटनास्थाळावरुन १. राहुल कल्याण खोटे, रा. मुगगाव ता.

(उर्वरीत पान २ वर)

## अफुची शेती करणा-या शेतक-यावर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

### ५ लाख रूपये किंमतीचे २० किलो अफुचे झाडे जप्त



बीड ।प्रतिनिधी

दि.२०.०२.२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा बीड यांना गोपनिय माहिती मिळाल्यावरून स्थागुशा येथील पोउपनि महेश विघ्ने, पोह अशोक दुबाले, पोह गोविंद राख, पोअ बबन सलगर व चापोह सुनिल राठोड तसेच पोलीस ठाणे अंभोरा येथील पोउपनि भडके, पोउपनि तावरे, पोअ पैठणे असेंनी मिळुन प्राप्त बातमीच्या ठिकाणी रात्रौ २१.३० वाजता छापा टाकला असता इसम नामे परसराम मोहन जगधने रा. पिपंळा ता. आष्टी जि. बीड याने त्याच्या ताब्यातील शेतातील कांद्याच्या पिकामध्ये अफुची बेकायदेशिर लागवड करून त्याचे संवर्धन व जोपासना करीत असतांना मिळुन आला. त्याच्या ताब्यतुन २० किलो वजनाची अफुची झाडे त्याला बोंडे व फुले

(उर्वरीत पान २ वर)

## मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींसाठी
## राज्य शासनाचा मोठा निर्णय



### विद्यमान सरपंचांचीच प्रशासक म्हणून नियुक्ती

मुंबई जालना / प्रतिनिधी

मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींबाबत राज्य शासनाने एक मोठा आणि ऐतिहासिक निर्णय घेतला असून यासंदर्भातील नवीन परिपत्रक २१ फेब्रुवारी २०२६ रोजी ग्रामविकास विभागाने निर्गमित केले आहे. या निर्णयानुसार ज्या ग्रामपंचायतींची मुदत २८ फेब्रुवारी २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी संपत आहे.अशा ग्रामपंचायतींवर आता बाहेरील प्रशासक नेमण्याऐवजी विद्यमान सरपंचांनाच प्रशासक म्हणून नियुक्त केले जाणार आहे.

राज्य शासनाने २३ जानेवारी २०२६ रोजी काढलेले जुने पत्रक रद्द करून २०

(उर्वरीत पान २ वर)


शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777







## संपादकीय....

# संशयाचं धुकं

विमानाचा ब्लॅक बॉक्स आगीत जळाल्याची माहिती आल्याने या प्रकरणाच्या चर्चेत आणखी वाढ झाली. तथ्य किती किंवा शक्यता किती याचा विचार न करता अशा चर्चांत मग प्रश्नांची भर पडत जाते. सध्या नेमकं हेच सुरू आहे. ते सहजपणे दुर्लक्ष करण्यासारखं नाही.

अजितदादांच्या अपघाती निधनाने सामान्य माणूस अजूनही बुचकळ्यात आहे. एखाद्या अनपेक्षित घटनेचा धक्का एवढा मोठा असतो, की घटना घडून गेल्यानंतरही बरेच दिवस ती घटना मनाला स्वीकारता येत नाही. सत्य कळत असतं, पण त्यावर विश्वास ठेवायला मन तयार नसतं. एका बाजूला अनपेक्षित, अविश्वसनीय घटना आणि त्यानंतर समाज माध्यमांवरून फिरत असलेल्या अजितदादांच्या अनेक चित्रफिती. त्यात भर आमदार रोहित पवार यांच्याकडून व्यक्त होत असलेल्या संशयाची. अपघात हे खरं तर अतार्किकच असतात. त्यामुळे, तर्काने त्यात अनेक प्रश्न उपस्थित होतच असतात. काही सर्वसामान्यांच्या मनात असलेले प्रश्न, काही तज्ज्ञांचे प्रश्न, आपल्याकडे प्रत्येक व्यवस्थेत असलेल्या अव्यवस्था आणि नेमक्या त्याच दिवशी घडलेल्या काही अपवादात्मक त्रुटी या सगळ्यांची गोळाबेरीज रोहित यांच्या प्रश्न आणि संशयात असल्याने त्या अपघाताभोवतीचं गूढ वाढत चाललं आहे. रोहित यांच्या आरोपवजा प्रश्नांना सुरुवातीला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि प्रवक्ते आनंद परांजपे यांनी उत्तरं दिली. पण, तरीही रोहित यांच्या पत्रकार परिषदा थांबेनात आणि त्यांच्या समर्थनार्थ अजितदादांचे धाकटे चिरंजीव जय पवारही आले, तेव्हां राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी उत्तरं द्यायला सुरुवात केली. रोहित यांच्या नेमक्या प्रश्नांना खरे तर हवाई वाहतूक विभागाशी संबंधित यंत्रणांनी उत्तर द्यायला हवं होतं किंवा निदान तज्ज्ञांचे अहवाल येईपर्यंत वाट बघण्याचं आवाहन तरी करायला हवं होतं. पण, विमान ज्या खासगी कंपनीचं होतं, त्या कंपनीने आपल्या बाजूने अजून तरी कोणतीच वस्तुस्थिती उघड न केल्याने आणि हवाई प्रवासी वाहतूक विभागाशी संबंधित नियंत्रक संस्थांनीही अजून तपासातील प्रगती अधिकृतरीत्या जनतेसमोर न ठेवल्याने रोहित यांच्या प्रश्नांची धार वाढत चालली आहे. सर्वसामान्य माणसालाही त्यामुळे काही प्रश्न पडू लागले आहेत.

# जनमाणसातील हक्काचा माणूस - मा.राधेश्याम भैय्या धस



आपल्या कर्तृत्वाने आणि सातत्यपूर्ण जनसेवेने अल्पावधीतच लोकमान्यता मिळवणारे आदर्श जामगावचे लोकनियुक्त सरपंच श्री. राधेश्याम भैय्या धस हे नाव आज गावकऱ्यांच्या मनात विश्वासाचे प्रतीक बनले आहे. नेतृत्वात प्रामाणिकपणा, कामात पारदर्शकता आणि जनतेशी असलेली आत्मीयता या बळावर त्यांनी लोकप्रियतेचे शिखर गाठले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण परिसरात आनंद, उत्साह आणि कृतज्ञतेचे वातावरण निर्माण झालेले दिसते. सर्वसामान्य जनतेकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे, हेच त्यांच्या कार्याची खरी पावती आहे. सरपंच मा. राधेश्याम भैय्या धस यांनी जामगावच्या विकासाला नवी दिशा दिली आहे. केवळ आश्वासनांवर न थांबता प्रत्यक्ष कृतीतून विकास साधण्याचा त्यांचा निर्धार स्पष्टपणे जाणवतो.

त्यांच्या संकल्पनेतून साकारलेले छत्रपती शिवाजी महाराज यांचे भव्य स्मारक हे गावाच्या वैभवात भर घालणारे ठरले आहे. हे स्मारक केवळ ऐतिहासिक अभिमान जपणारे नाही, तर तरुण पिढीसाठी प्रेरणास्थान बनले आहे. इतिहासाची जाणीव आणि भविष्याचा वेध यांचा सुंदर संगम त्यांच्या कार्यातून दिसून येतो. गावातील पायाभूत सुविधांची उभारणी, स्वच्छता अभियान, पाणीपुरवठा सुधारणा, शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांना चालना अशा विविध क्षेत्रांत त्यांनी सकारात्मक बदल घडवून आणले. गावाचा सर्वांगीण विकास हाच त्यांचा ध्यास असल्याने प्रत्येक कामात नियोजनबद्धता आणि सातत्य दिसते.

मा. राधेश्याम भैय्या धस हे केवळ सरपंच म्हणूनच नव्हे, तर एक यशस्वी व्यावसायिक म्हणूनही ओळखले जातात. व्यवसायातील त्यांची दूरदृष्टी, निर्णयक्षमता आणि प्रामाणिक व्यवहार यामुळे त्यांची वेगळी ओळख निर्माण झाली आहे. तरुण उद्योजकांसाठी ते आदर्श ठरले असून, स्वावलंबन आणि कष्टाच्या बळावर यश मिळवता येते, याचा त्यांनी प्रत्यक्ष दाखला दिला आहे.

तरुणांमध्ये त्यांचा विशेष प्रभाव असून, त्यांच्या प्रश्नांबाबत ते नेहमीच तत्पर असतात. रोजगार, शिक्षण आणि कौशल्यविकास यासारख्या विषयांवर त्यांनी सकारात्मक भूमिका घेतली आहे. युवकांना मार्गदर्शन करून समाजघडणीमध्ये त्यांना सहभागी करून घेण्याचा त्यांचा प्रयत्न उल्लेखनीय आहे.

मा. राधेश्याम भैय्या धस यांची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्यांची माणुसकी. कोणत्याही व्यक्तीच्या सुख-दुःखात ते स्वतःहून सहभागी होतात. सर्वसामान्य माणसाच्या हाकेला धावून जाणारा नेता अशी त्यांची ख्याती आहे. लोकांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर तात्काळ उपाययोजना करण्याची त्यांची वृत्तीच त्यांना जनतेचा 'हक्काचा माणूस' बनवते. त्यांच्या नेतृत्वात गावात एकात्मता, सौहार्द आणि प्रगतीची भावना दृढ झाली आहे. विकासकामांबरोबरच सामाजिक बांधिलकी जपण्याचा त्यांचा दृष्टिकोन विशेष उल्लेखनीय आहे. लोकप्रियता ही केवळ पदामुळे मिळत नाही; ती मिळते निस्वार्थी सेवेमुळे, कार्यक्षम नेतृत्वामुळे आणि लोकांच्या मनाशी जुळलेल्या नात्यामुळे. सरपंच मा. राधेश्याम भैय्या धस यांनी आपल्या कार्यातून हे सिद्ध केले आहे. जामगावच्या प्रगतीच्या वाटचालीत त्यांचे योगदान मोलाचे असून, भविष्यातही त्यांच्या नेतृत्वाखाली गाव नव्या उंचीवर पोहोचेल, असा विश्वास ग्रामस्थांना आहे. त्यांचा हा जनसेवेचा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत असून, विकासाची ध्येयदृष्टी आणि माणुसकीची जपवणूक यांचा सुंदर संगम म्हणजेच सरपंच मा. राधेश्याम भैय्या धस होत. वाढदिवसानिमित्त त्यांना मनस्वी शुभेच्छा....!!!

शब्दांकन
राजेंद्र लाड,आष्टी
९४२३१७०८८५




# जागर प्रतिष्ठानच्या पाठपुराव्याला यश

## धारुरच्या महादूर्गासाठी ११ कोटी मंजूर

किल्ले धारूर ।प्रतिनिधी

धारूरच्या महादुर्गासाठी शासनाने ११ कोटी रुपये मंजूर केले आहेत. त्यामुळे आता याचा सर्वांगीण विकास होईल. खऱ्या अर्थाने जागर प्रतिष्ठानने वेळोवेळी केलेल्या पाठपुराव्यामुळे या मोठ्या मागणीला अखेर यश मिळाले आहे.बीड जिल्ह्यातील ऐतिहासिक वारसा असणाऱ्या किल्ले धारूर येथील महादूर्ग गडाच्या संवर्धनसाठी जागर प्रतिष्ठान गेल्या अनेक वर्षांपासून कार्य करत आहे ,पूर्वी आलेल्या निधी मधून झालेले काम निष्कृठ दर्जाचे झाल्याने काही दिवसातच भिंती पडल्या होत्या त्यावर ही जागर प्रतिष्ठान वारंवार आवाज उठवत होते.

दरम्यान महादूर्गासाठी निधी मिळावा यासाठी जागर प्रतिष्ठान संघटनेचे उपोषण सुद्धा केले होते. संघटनेनं वारंवार निवेदन देऊन पाठपुरावा सुरूच ठेवला होता तसेच जागर प्रतिष्ठानचे अध्यक्ष किसन पाटील चव्हाण यांनी माजी उप मुख्यमंत्री स्व.अजित दादा पवार यांची तीन वेळा या संदर्भात भेट घेतली होती. जागर प्रतिष्ठान आयोजित दीपोत्सव सोहळ्यात बोलताना माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी ही मागणीला दुजोरा दिला होता.महादूर्गासाठी निधी मिळाल्याने दुर्गप्रेमी मध्ये आनंदाचे वातावरण आहे .

## जाहिर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार नामे गणेश बालाप्रसाद सोनी, रा. मोटे गल्ली, गेवराई ता. गेवराई जि. बीड येथील कायम स्वरुपी रहिवाशी असून माझे पक्षकार यांनी रामेश्वर पि. सर्जेराव मोटे, रा. मोटे गल्ली, गेवराई ता. गेवराई. जि. बीड, यांचे मालकी व ताब्यातील मौजे गेवराई शिवारातील गट नं. ९४/ड मधील त्यांच्या नावे असलेले क्षेत्र ०० हे ५७ आर जमीनीपैकी क्षेत्र ०० हे १० आर ज्याची चतुः सिमा खालील प्रमाणे

पुर्वेस : लिहुन देणार यांची उर्वरीत जमीन
पश्चिमेस : छत्रपती जिनिंगचा रस्ता
दक्षिणेस : कुंड छत्रपती जिनिंग.
उत्तरेस : जातेगाव रस्ता.

वरील चतुः सिमेच्या आतील जमिन त्यामधील दगड, माती तदंगभुत वस्तुसह माझे पक्षकार यांनी रामेश्वर पि. सर्जेराव मोटे यांचेकडून कायम खरेदी करण्याचा ठराव केलेला आहे. सदर विक्री जमिनीबाबत कोणाचा आक्षेप, हरकत, उजर असेल तर त्यांनी वरील विक्री जमिनीबाबत आपला लेखी आक्षेप व पुरावा असल्यास सात दिवसांच्या आत आणून द्यावा. सात दिवसांच्या नंतर कोणाचाही आक्षेप अथवा लेखी पुरावा आल्यास तो माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. सबब हे जाहिर प्रगटन.

दिनांक २१/०२/२०२६
गेवराई

**जाहिर प्रगटन देणार**
**गणेश पा.बालाप्रसाद सोनी**

**मार्फत**
**ॲड.एस.एम.शेंबडे, गेवराई**

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९०/२०२६**
**कांताबाई ब्र. शेषराव कद्रे व इतर**
**(ॲड. ए.एस. नाकाडे, गेवराई यांच्या माध्यमातून)**

ज्याअर्थी मयत नामे शेषेराव पि. मारुती कदरे हे/हया दिनांक ०९/११/२०२५ रोजी भगवान नगर, गेवराई ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १. कांताबाई भ्र. शेषेराव कदरे, वय ६८ वर्षे धंदा शेती व घरकाम रा. वडगाव ढोक ता. गेवराई जि.बीड ह.मु. भगवान नगर, गेवराई ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. २. नवनाथ पि. शेषेराव कदरे, वय ४५ वर्षे धंदा शेती रा. वडगाव ढोक ता. गेवराई जि.बीड ह.मु. भगवान नगर, गेवराई ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ३. गणेश पि. शेषेराव कदरे, वय ४३ वर्षे धंदा शेती रा. वडगाव ढोक ता. गेवराई जि.बीड ह.मु. भगवान नगर, गेवराई ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ४. मंगलबाई भ्र. बाळासाहेब मुंडे, वय ४८ वर्षे धंदा घरकाम रा. रा. वडगाव ढोक ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ५. अनिता भ्र. कुमार सांगळे, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम, रा. वडगाव ढोक ता. गेवराई जि.बीड यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत शेषेराव पि. मारुती कदरे यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०४/०२/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख - १६/०३/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती. एस पाटील यांचे न्यायालयात**
**एच किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: १२४/२०२६**
**सुमन - विरूध्द - निरंक**
**(मृत-ॲड जी.एस. डोईफोडे)**
**रामभाऊ बालाजी तारुकमारे यांच्या नावाने स्वाक्षरी केलेले मौजे मुंबई येथे मयत झालेले आहेत.**

अर्जदार

१) सुमन भ्र. जीवन अहिरे वय ६५ वर्षे धंदा-घरकाम रा नॅशनल सुर्योदय शाळेच्या समोर चेंबूर, मुंबई

२) शालन चत्रभुज शेजवळ वय ६२ वर्षे, धंदा घरकाम रा बालाजी वडापाव उंडे निवास नेहरू नगर कांजूर मार्ग भांडुप पूर्व मुंबई

३) ज्योती भ्र. लहु तुरूकमारे वय ५७ वर्षे, धंदा घरकाम रा. नॅशनल सकुल, इंदीरा नगर, चेंबुर कॉलनी मुंबई ४०००७४

४) रत्नमाला भ्र. विठ्ठल तुरूकमारे वय ५४ वर्षे धंदा घरकाम रा इंदीरा नगर, चेंबुर कॉलनी झुलेलाल मंदीर मुंबई ४०००७४

यांना शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, याक पिणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे रामभाऊ बाळाजी तुरूकमारे रा. सावरगाव ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख : ३१.०३.२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**जाहीर प्रगटन**
**ॲड.ए.एस.गरूड**
श्रीमती वंदना व्ही जोशी दिवाणी न्यायाधीश व स्तर बीड यांचे न्यायालयात
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १८६८/२०२५**
**संभाजी पि.मधुकर लोंढे व इतर वि.निरंक**

अर्जदार **१. संभाजी पि.मधुकर लोंढे, वय-३९ वर्षे, धंदा-नौकरी, रा.कोळगांव ता.गेवराई जि.बीड, २. सिमा भ्र.बप्पासाहेब शेळके वय-४२ वर्षे, धंदा-घरकाम, रा.पुरूषोत्तमपुरी ता.माजलगांव जि.बीड, ३. सुलभा संदिपान पवार वय-४१ वर्षे, धंदा-घरकाम, रा.कोळी सिरसगांव ता.अंबड जि.जालना, ४. वर्षा भ्र. गणेश घोरपडे, वय-४० वर्षे, धंदा-घरकाम, रा.शिंगवे, ता.साकारवाडी ता.राहता जि.अहमदनगर**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटन नोटीसव्दारे कळविण्यात येते की, या न्यायालयामध्ये वरील अर्जदार क. १ ते ४ हे मयत नामे नंदाबाई मधुकर लोंढे यांचे मुले व मुली आहेत. अर्जदारांचे वडील व मयताचे पती नामे मधुकर लोंढे हे यापुर्वीच मयत झालेले आहेत.असे की मयत नामे नंदाबाई मधुकर लोंढे यांचा दिनांक १५/०२/२०२५ रोजी कासलीवाल मारवेल वेस्ट, छत्रपती संभाजीनगर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहेत. त्याचे वारस असल्या बाबत दिवाणी न्यायालय क.. स्तर, गेवराई या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज क. ५०९/२०२५, संभाजी मधुकर लोंढे वि. निरंक हा अर्ज दिनांक १५/०९/२०२५ रोजी निकाली काढण्यात आला. त्यानंतर उपरोक्त अर्जदाराने मा. दिवाणी न्यायालय व. स्तर, बीड येथे कलम ३७२ भारतीय वारसा हक्क कायदा नुसार वारस असल्याचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज केला आहे. मयाताचे पश्चात सदर वरील अर्जदार हे कायदेशीर वारस असुन त्यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाही.

| अ.क्र. | मयत खातेदारांचे नाव व पत्ता | मयत खातेदाराच्या नावे शिल्लक रक्कम | मयत खातेदाराचा खाते नंबर व बँकेचे नाव |
|---|---|---|---|
| १ | नंदाबाई मधुकर लोंढे | रू.८,५४,९७४.११/- | महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा कोळगांव ता.गेवराई जि.बीड खाते.क्र.५४५२३००२६३१ |

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

पान १ वरून...

**मुदत संपलेल्या ....**

फेब्रुवारी २०२६ च्या राजपत्रातील तरतुदीनुसार ही नवीन कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.निवडणुका वेळेत घेणे शक्य नसल्यास प्रशासक नियुक्त करण्याचे अधिकार शासनाला असून, याच अधिकाराचा वापर करून हा निर्णय घेण्यात आला आहे.

सरपंचांना पुढील सहा महिने कारभाराची जबाबदारी

तांत्रिक आणि प्रशासकीय कारणांमुळे ग्रामपंचायत निवडणुका वेळेत घेता न आल्यास विद्यमान सरपंचांना पुढील सहा महिन्यांसाठी किंवा निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत जे आधी असेल त्या कालावधीपर्यंत प्रशासक म्हणून कारभार पाहण्याची संधी देण्यात येणार आहे.

सरपंच परिषद व संघटनांच्या आंदोलनांना यश

महाराष्ट्र राज्य सरपंच परिषद तसेच विविध संघटनांनी वेळोवेळी केलेल्या मागण्या आंदोलन आणि न्यायालयीन निकालांच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने हा सकारात्मक निर्णय घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. लोकप्रतिनिधींच्या भावना लक्षात घेऊन घेतलेला हा निर्णय ग्रामीण स्वराज्य संस्थांसाठी महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.ग्रामपंचायत कारभारात सातत्य राखण्यास मदत

या निर्णयामुळे राज्यातील मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींचा कारभार रिक्त न राहता विद्यमान सरपंचांच्याच नेतृत्वाखाली सुरू राहणार असल्याने ग्रामीण विकासाच्या कामांना खंड पडणार नाही अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**अफुची शेती करणा-या....**

असलेली, त्याची किमंत अंदाजे ५ लाख रूपयाचा मुद्देमाल जप्त करून सदर इसमाविरूध्द पोलीस ठाणे अंभोरा येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ४६/२०२६ कलम ८ (ख), १५ एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री. नविनत काँवत, मा. अप्पर पोलीस अधीक्षक बीड श्री. सचिन पांडकर, मा. उपविभागीय अधिकारी आष्टी श्री. हानपुडे पाटील, पोलीस निरीक्षक स्थागुशा बीड श्री. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि महेश विघ्ने, पोलीस हवालदार अशोक दुबाले, गोविंद राख, बबन सलगर, सुनिल राठोड असेंनी व पोस्टे अंभोरा येथील पोउपनि श्री. भडके, पोउपनि श्री. तावरे, पोलीस हवालदार बांगर व पैठणे असेंनी मिळून केली आहे.

तरी सर्व जनतेस बीड जिल्हा पोलीस दलाच्या वतीने आवाहन करण्यात येते की, पोलीस अधीक्षक कार्यालय बीड येथे अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन करण्यात आला असुन त्याचा हेल्पलाईन क्रमांक ९२७०२४३२०० असा आहे. आपणास अंमली पदार्थ खरेदी, विक्री, उत्पादन, साठवणुक, वाहतुक बाबत काही एक माहिती मिळाल्यास वरील क्रमांकावर किवा सपोनि रत्नाकर घोळवे (एनडीपीएस कक्ष प्रमुख) मोक्र. ८८८८८२४१०० यावर कळविण्यात यावे. आपले नाव गुप्त ठेवण्यात येईल.

**आष्टी- ब्रम्हगाव रोडलगत....**

पाटोदा जि. बीड २. भरत ऊर्फ आमृत बाबासाहेब भोसले, रा. पारगाव घुमरा ता. पाटोदा जि. बीड यांना ताब्यात घेतले आहे.

सदर इसमांनी संगनमताने विनापरवाना बेकायदेशीररीत्या शत्र बाळगल्याने त्यांच्याविरुद्ध -ीाी -र्ली, १९५९ अंतर्गत कलम ३ व २५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक बीड, मा. अपर पोलीस अधीक्षक बीड, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग आष्टी यांचे मार्गदर्शानाखाली करण्यात आली असुन सदर घटनेचा पुढील तपास पोउपनि श्रीकृष्ण शिंदे पोलीस स्टेशन आष्टी हे करत असुन सदर घटनेतील एक फरार आरोपीचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

पोलीस प्रशासन नागरिकांना आवाहन करते की, बेकायदेशीर प्रकरणी कोणतीही माहिती मिळाल्यास तात्काळ पोलीसांना कळवावी.

# १ लाख रुपयाचा धनादेश वटला नाही म्हणून आरोपी सुभाष शिंदे यास

## ६ महिने शिक्षा व धनादेश रक्कम सह पन्नास हजार रुपयाचा दंड

**बीड ।प्रतिनिधी**

**फिर्यादी नामें विष्णू भरत कुलगुडे राहणार करचुंडी ता. जि. बीड येथील रहिवासी असून आरोपी हा स्वराज्य नगर ता. जि. बीड. येथील रहिवासी आहे.आरोपीचे मुळ गाव करचुंडी आहे. फिर्यादी व आरोपी हे एकाच गावचे रहिवाशी असून उभयतांमध्ये १० ते १५ वर्षापासून मित्रत्त्वाचे, विश्वासाचे संबंध आहेत.**

आरोपी हा गंगाभारती महाराज ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था म.करचोंडी, ता.जि.बीड याचे चेअरमन/अध्यक्ष होता.आरोपीच्या पतसंस्थेत आरोपीने मुदत ठेव करण्याकरीता फिर्यादीस विनंती केली. फिर्यादीने आरोपीसोबतचे मागील मित्रत्त्वाचे विश्वासाचे संबंध पाहता, फिर्यादीने आरोपीच्या पतसंस्थेमध्ये रक्कमरू.२,००,०००/- (दोन लक्ष रूपये) ची दि.१३-०५-२०२२ रोजी मुठत ठेव केली. त्याचा पावती ४२१५ असा होता. त्यानंतर आरोपीने जुलै २०२३ मध्ये रक्कम रू.१,००,०००/- (एक लक्ष रूपये) व्यवसायिक व घरगुती अडचणी करीता फिर्यादीकडे हात उसने मागितली व फिर्यादीने आरोपी याचे सोबतचे विश्वासाचे व मित्रत्त्वाचे संबंध पाहता, फिर्यादीने आरोपीस रक्कम रू.१,००,०००/- (एक लक्ष रूपये) दि.२० जुलै २०२३ रोजी रोख दिले. सदर हात उसने रक्कम रू.१,००,०००/- (एक लक्ष रूपये) आरोपीने फिर्यादिस ६ महिन्यात परत करण्याचे आश्वासन दिले. फिर्यादीने जानेवारी २०२४ मध्ये आरोपीस हात उसने दिलेल्या रक्कम रू.१,००,०००/- (एक लक्ष रूपये) ची मागणी केली असता, आरोपीने त्याचे खाते असलेल्या श्री छत्रपती राजर्षी शाहू अर्बन को-ऑप.बँक लि.बीड, शाखा -बार्शी रोड, बीड, येथील खाते क्र.०२६००२३००००२७२३ चा धनादेश क्र.०२३४३९ दिनांक रक्कम रू.१,००,०००/- (एक लक्ष रूपये) चा धनादेश फिर्यादीचे हक्कात दिला व सदर धनादेश नमूद तारखेला वटला जाईल व फिर्यादीस रक्कम मिळून जाईल, असे आश्वासन आरोपीने फिर्यादीस दिले.फिर्यादीने आरोपीवर विश्वास ठेवून सदरचा धनादेश आरोपीकडून स्वीकारला. फिर्यादीने सदर धनादेश त्याचे खाते असलेल्या भारतीय स्टेट बॅंक, शाखा- शिवाजी नगर, बीड येथील खातेमध्ये दि.२३-०२-२०२४ रोजी वटणेकरीता जमा केला असता, सदर धनादेश आरोपीच्या खात्यात धनादेश वटण्या इतपत रक्कम शिल्लक नाही या कारणास्तव दिनांक २६-०२-२०२४ रोजी परत केला. त्यानंतर फिर्यादीने आरोपीशी संपर्क साधला, पण आरोपीनेफिर्यादीस उडवा-उडवीची उत्तरे दिली व सदर धनादेशावरील रक्कम देण्यास साफ नकार दिला. त्यानंतर फिर्यादीची खात्री झाली की, आरोपीने त्याचे खात्यात धनादेश वटण्या इतपत पुरेशी रक्कम शिल्लक नसताना, फिर्यादीस धनादेश देऊन आरोपीने जाणिवपुर्वक फिर्यादीची फसवणूक केली आहे. त्यानंतर फिर्यादीने सदरचे धनादेश न वटता परत आल्यानंतर विधिज्ञा मार्फत फिर्यादीने आरोपीस दि.०८-०३-२०२४ रोजी सदरच्या धनादेशावरील रक्कम मागणी नोटीस वकीलामार्फत रजिस्टर नोटीस पाठवली सदरची नोटीस आरोपीस ०९-०३-२०२४ रोजी मिळाली सदर नोटीस मिळून देखील आरोपीने मुदतीत रक्कम फिर्यादीस परत केली नाही त्यामुळे फिर्यादीने मा. मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब,बीड येथे कलम १३८ निगोशिएबल इन्स्टुमेंट ऍक्ट अन्वये तक्रार दाखल केली सदर फिर्याद दाखल केल्यानंतर सदर प्रकरण एस .एस.सी.५७२/२०२४ नोंदवले गेले. सदर प्रकरण फिर्यादीतर्फे फिर्यादी विष्णू कुलगुडे यांची साक्ष नोंदवण्यात आली व अभिलेखावर



मूळ धनादेश,धनादेश न वाटता परत आल्याचा मेमो, नोटीस आर पी ए डी पावती, इत्यादी कागदपत्रे दाखल केले सदर प्रकरणात आरोपीतर्फे सदर व्यवहार हा पूर्वीचा असलेबाबत असल्याबाबत बचाव आरोपीने घेतला. युक्तिवादअंती फिर्यादीच्या पुराव्याचे अवलोकन करून माननीय अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब बीड. यांनी सर्व साक्षी पुराव्यांचे अवलोकन अवलोकन व फिर्यादीचे विधिज्ञ यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य करून मा. अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब यांनी आरोपीस तीन महिने शिक्षा व धनादेश रक्कम व दंड मिळून अशी एकूण १ ,५०,०००/- एक लाख पन्नासहजार रुपये रक्कम फिर्यादीस देण्याचे आदेश केले. सदर प्रकरणात फिर्यादी तर्फे ड. सागर नाईकवाडे, यांनी काम पाहिले त्यांना ड. सुधीर जाधव, ड. सतीष गाडे, ड. राजेश जाधव, ड. विवेक डोके ड. कृष्णा आवारे, आकाश गायकवाड यांनी सहकार्य केले.

# सांस्कृतिक कार्यक्रमातून कलागुणांना वाव मिळतो - नगराध्यक्षा गिताभाभी पवार

## शानदार समारंभात बक्षिस वितरण संपन्न

गेवराई ।प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात सांस्कृतिक कार्यक्रमाला अनन्यसाधारण महत्त्व असून, विविध सांस्कृतिक कार्यक्रमातून प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो. त्यामुळे, सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रोत्साहन दिले पाहिजे. असे प्रतिपादन गेवराई च्या नगराध्यक्षा गिताभाभी बाळराजे पवार यांनी येथे बोलताना केले.

बुधवार ता. १८ रोजी, वार बुधवार, भगवती टॉकीज परिसराच्या मैदानावर, गेवराई नगर परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सांस्कृतिक महोत्सवात त्या बोलत होत्या. व्यासपीठावर बाळराजे पवार, नायब तहसीलदार संजय सोनवणे , जिपचे माजी सभापती युद्धाजीत पंडित, पोलिस निरीक्षक किशोर पवार, नगर परिषदेचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, उपाध्यक्षा रेवती घुंबार्डे,गटनेते ड. राजेंद्र राक्षसभुवनकर, माजी नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, सभापती महेश सौंदरमल, सभापती बद्दुशेठ, नपचे सभापती शहेदाद भाई, उपसभापती सोनाली सुतार, नगरसेवक राजेश टाक, नगरसेविका अंकिता धोंडलकर, सभापती प्रशांत राख, नगरसेवक शिनुभाऊ बेदरे, राजाभाऊ आर्दड, नगरसेवक आबासाहेब काकडे, माजी नगराध्यक्ष सुशिल जवंजाळ, उपाध्यक्ष दादासाहेब गिरी यांची उपस्थिती होती.






नगराध्यक्षा गीताताई पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून, नगर परिषदेच्या स्वच्छता अभियानात सहभाग घेण्याचे आवाहन केले. उपस्थित मान्यवरांनी ही शुभेच्छापर संदेश दिला. नप ने आयोजित केलेल्या सांस्कृतिक महोत्सवात विविध शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून, बहारदार अभिनयातून लक्षवेधी कलाकृती सादर करून रंगमंचावर धमाल केली. बुद्धिबळ स्पर्धा निकालात प्रथम- संस्कार सिद्धार्थ नरवडे, चिन्तेश्वर प्राथ विद्यालय, द्वितीय - शिवतेज दिनेश औटे, केंब्रिज आय स्कूल ,प्रथम - प्राची प्रशांत राऊत केंब्रिज आय स्कूल, द्वितीय - सिद्धी उमेश चौडिया, तुळजा भवानी स्कूल,

प्रथम - अश्विन मच्छिद्र दहीवाळ विमला माध्यमिक विद्यालय,द्वितीय- रणवीर तुळशिराम सोळंके ,केंब्रिज आय स्कूल, प्रथम - विद्या शिवप्रसाद पोपळघट, सेंट झेवियर्स स्कूल ,द्वितीय - काव्य अमोल कनपुरे याने बाजी मारून यश संपादन केले.चित्रकला स्पर्धेत प्रथम -अक्षरा राजेंद्र राठोड, सेंट झेवियर्स स्कूल,द्वितीय- महेश मधुकर तौर, शारदा विद्यामंदिर ,तृतीय- ओवी प्रवीण वावरे, केंब्रिज आय स्कूल, प्रथम-महिमा लक्ष्मण सोनावणे, सेंट झेवियर्स स्कूल, द्वितीय - आराध्य अप्पासाहेब चव्हाण, केंब्रिज आय स्कूल,तृतीय-श्रुतिका लहू म्हेत्रे, विमला माध्यमिक विद्यालयाला मिळाले.रांगोळी स्पर्धेत प्रथम-सानिका आखरे, केंब्रिज आय स्कूल, द्वितीय- वैष्णवी राम सोळंके,चिंतेश्वर प्रा विद्यालय ,तृतीय-आरोही प्रशांत जाधव,विमला विद्यामंदि,प्रथम-गौरी दादासाहेब खडके,विमला माध्यमिक विद्यालय ,द्वितीय-प्राजक्ता अशोक कादे ,कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय ,तृतीय-आदिती महादेव पांचाळ,सेंट झेवियर्स स्कूल गेवराई यांचा नंबर आला.वक्तृत्व स्पर्धेत प्राथमिक गटात प्रथम- मोमीन अहमन आत्तार, मिल्लत इंग्लिश स्कूल,द्वितीय -ईश्वरी रामेश्वर भुते,तुळजा भवानी इंग्लिश स्कूल,तृतीय-तृप्ती संभाजी नरवाडे,केंब्रिज आय स्कूल , माध्यमिक गटातून प्रथम- प्रियांशु रविकांत लाड,सेंट झेवियर्स स्कूल,द्वितीय- मनस्वी दिनकर शिंदे,सेंट झेवियर्स स्कूल,तृतीय- नेहा रमेश म्हस्के, केंब्रिज आय स्कूल गेवराई हिने बाजी मारून यश संपादन केले.शोभायात्रा व पथसंचालनात जि. प कन्या प्रशाला गेवराई शाळेला प्रथम क्रमांक मिळाला.न्यू इरा इंग्लिश स्कूल गेवराई या शाळेला द्वितीय तर केंब्रिज आय स्कूलने तृतीय क्रमांक पटकावला आहे.चॅम्पियन्स संघ म्हणून सेंट झेवियर्स स्कूल गेवराई यांना , उपविजेता संघाचा मान द केम्ब्रिज व्हली इंटरनशनल स्कूल गेवराईला देण्यात आला. कार्यक्रमाचे परिक्षण प्रकाश भुते , प्रशांत रूईकर, दिनकर शिंदे, सुशिल टकले, अंजली खोबरे, अमित गाडे यांनी केले. सूत्रसंचालन श्याम वादे, प्राची दरडे यांनी केले.




# खोलेश्वर प्रा. विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

खोलेश्वर प्रा.विद्यालयात(केंद्र विभाग) छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आले. यावेळी श्रीधर चौरे, शिक्षिका सौ.सुनिता सोनवणे, प्रमुख वक्ते विठ्ठल गुट्टे उपस्थित होते. इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांची वेशभूषा सादर केली. इयत्ता चौथीच्या विद्यार्थिनींनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी अमृत

वचन सादर केले. चि. आयुष सोनवणे या विद्यार्थ्याने छत्रपती शिवाजी महाराजांविषयी सुंदर असेस्वगतसादर केले. पाचवीतील विद्यार्थिनींनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी शौर्यकथा सांगितली.इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी शिवजन्मोत्सव गीतावर नृत्य केले तर विद्यार्थिनींनी आम्ही गडच्या डोंगरचे राहणार हे पद्य गायिले.सुनिता सोनवणे यांनी सांगितले की, जिजामाता यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर संस्कार म्हणून ते घडले.विठ्ठल गुट्टे यांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाच्या गोष्टी सांगितल्या. होते याविषयी गोष्टीरूपाने माहिती सांगितली. श्रीधर चौरे यांनी विद्यार्थ्यांना शिवाजी महाराजांसारखे पराक्रमी होऊन देशाची सेवा करावी असे आवाहन केले. मुख्याध्यापक विष्णू सोनवणे यांच्या मार्गदर्शनातून झालेल्या कार्यक्रमाचे प्रिती बलुतकर यांनी संचालन करून आभार मानले. यावेळी शिक्षिका,शिक्षक, कर्मचारी,विद्यार्थी उपस्थित होते.

## बा-हाळी येथे जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन

मुक्रमाबाद ।प्रतिनिधी

जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी संस्थान नानिजच्या अंधश्रद्धा निर्मूलन उपक्रमा अंतर्गत जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या बा-हाळी येथे दि.२४ फेब्रुवारी २६ रोज मंगळवारी पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या सिद्धपादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले असून त्या अनुषंगाने उदगीर रोड , भवानी पेट्रोल पंपाच्या पाठीमागे उमाटे पाटील यांच्या शेतात सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सकाळी ८ वा.शहरातून भव्य मिरवणूकीने पादुका संतपिठावर स्थापना,गूरुपूजन,उपासक दिक्षा, आरती सोहळा, पुष्पवृष्टी, प्रवचनकाराचे अम्रततूल्य प्रवचन, दर्शन ,सामाजिक उपक्रम असा भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास नांदेड जिल्ह्यसह लातूर जिल्ह्यातील उदगीर ,जळकोट तालुक्यातून २५ ते ३० हजार भाविक भक्त उपस्थित राहणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विविध प्रकारच्या समीती गठीत करण्यात आले आहेत.सर्वांना महाप्रसाद ,पार्किंग व्यवस्था ,पिण्याचे शूध्द पाणी,भव्य मंडप उभारणी करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील भाविक भक्तांनी जगद्गुरू रामानंदाचार्यजी नरेंद्राचार्यजी यांच्या बा-हाळी



येथील पादुका दर्शन सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा सेवा समीती नांदेड (दक्षिण),तालुका सेवा समीती मूखेड व उत्सव समीती ,कार्य समीती बा-हाळीच्या वतीने करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई,शाखा केज येथे पत्रकार लिंबराज गायकवाड यांची सदस्य पदावर निवड

केज ।प्रतिनिधी

दि.१९ फेब्रुवारी २०२६ रोजी पत्रकारितेच्या क्षेत्रात सामाजिक बांधिलकी आणि निष्ठेने कार्य करणारे लिंबराज शंकरराव गायकवाड मौजे येवता ता.केज,जि. बीड यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा, केज येथे सदस्य पदावर निवड करण्यात आली. ही निवड पत्रकारितेतील त्यांच्या सातत्यपूर्ण कार्याची दखल म्हणून करण्यात आल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी नमूद केले.केज येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी सर यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकाध्यक्ष चंद्रकांत पाटील



यांच्या हस्ते नियुक्ती जाहीर करण्यात आली.यावेळी सचिव विजय बिक्कड,तालुका उपाध्यक्ष प्रदीप गायकवाड,तालुका कार्याध्यक्ष नंदकुमार मिसाळ,पांडुरंग कसबे, विश्वास राऊत,कृष्णा केदार,इलेक्ट्रिक बाइक शोरूमचे मालक मच्छिंद्र लांब साहेब,पत्रकार अशोक सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पांडुरंग कसबे यांनी केले. सचिव विजय बिक्कड यांनी संघटनेच्या स्थापने पासूनचा इतिहास आणि पत्रकार संघाची भूमिका याविषयी सविस्तर माहिती दिली.त्यांनी सांगितले की,पत्रकारिता ही केवळ बातमी देण्या पुरती मर्यादित नसून समाजातील सत्य,न्याय आणि पारदर्शकतेसाठी लढण्याचे प्रभावी माध्यम आहे.तालुकाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी नव्या सभासद लिंबराज गायकवाड यांना शुभेच्छा देत संघटनेच्या कार्यात सक्रिय सहभागाची अपेक्षा व्यक्त केली. यावेळी मनोगत व्यक्त करताना नंदकुमार मिसाळ यांनी आदर्श पत्रकारितेचे तत्त्व, जबाबदारी आणि सामाजिक कर्तव्य यावर सखोल विचार मांडले. त्यांनी सांगितले की, पत्रकारिता लोकशाहीचा चौथा स्तंभ असून तिची जबाबदारी अधिक मोठी आहे.सत्य आणि निष्पक्षता जपणे हीच खरी पत्रकाराची ओळख आहे.लिंबराज गायकवाड यांची निवड ही केवळ वैयक्तिक गौरवाची बाब नसून केज तालुक्यातील पत्रकारितेला बळकटी देणारी घटना ठरते. स्थानिक पातळीवर सक्षम,जबाबदार आणि समाजाभिमुख पत्रकारांची गरज लक्षात घेता,संघटनेत नव्या ऊर्जेची भर पडल्याचे चित्र दिसते.ही नियुक्ती भविष्यात संघटनेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांना अधिक प्रभावी पणे वाचा फोडण्यास हातभार लावेल,अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी सर यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या नियमानुसार वाटचाल करणार असल्याचे लिंबराज गायकवाड यांनी सांगितले.यावेळी त्यांनी पदाधिकारी यांचे आभार मानले आहेत.

# डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील मजबूत दुवा म्हणजे परिचारिका - डॉ. दिपाली उमाळे

## एसएनडीटीच्या लीलाबाई ठाकरेसी कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये ७४ वा कॅन्डल लाइटिंग व पदवीदान सोहळा उत्साहात संपन्न

मुंबई ।प्रतिनिधी

वैद्यकीय क्षेत्रात डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील सर्वात मजबूत भिंत किंवा आधारस्तंभ म्हणजे परिचारिका होय. तिचे समर्पण आणि सेवाभाव हाच आरोग्यव्यवस्थेचा कणा आहे असे गौरवपूर्ण उद्गार मान्यवरांनी काढले. निमित्त होते, एसएनडीटी महिला विद्यापीठांतर्गत असलेल्या लीलाबाई ठाकरेसी कॉलेज ऑफ नर्सिंगच्या ७४व्या कॅन्डल लाइटिंग आणि पदवीदान समारंभाचे.

बुधवार, १८ फेब्रुवारी २०२६ रोजी चर्चगेट येथील सर सीताराम व लेडी शांताबाई पाटकर दीक्षांत सभागृहात हा दिमाखदार सोहळा पार पडला. १९५२ साली स्थापन झालेले हे महाविद्यालय महाराष्ट्रातील पहिले नर्सिंग महाविद्यालय असून, महिला सक्षमीकरण आणि गुणवत्तापूर्ण नर्सिंग शिक्षणात या संस्थेचा मोठा वाटा आहे.

या सोहळ्यासाठी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांनी विशेष संदेशाद्वारे आयोजक व नर्सिंग विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. डॉ. उज्वला




चक्रदेव यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून पी. डी. हिंदुजा हॉस्पिटलचे क्रिटिकल केअर कन्सल्टंट डॉ. खुशराव बजन उपस्थित होते, तर कुलसचिव डॉ. विलास नंदावडेकर यांची विशेष उपस्थिती लाभली.

नर्सिंग क्षेत्रातील 'पवित्र' प्रवेश

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत आणि विद्यापीठ गीताने झाली. त्यानंतर पारंपारिक दीपप्रज्वलन आणि 'कॅन्डल लाइटिंग' (नर्सिंग शपथविधी) सोहळा पार पडला. हातात मेणबत्ती घेऊन घेतलेली ही प्रतिज्ञा विद्यार्थिनींच्या सेवाभावी आयुष्याची खऱ्या अर्थाने सुरुवात ठरली. प्राचार्या डॉ. शोभा गायकवाड यांनी महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल सादर करताना शैक्षणिक प्रगती आणि संशोधनातील योगदानाचा आढावा घेतला.

मान्यवरांचे प्रेरणादायी विचार

डॉ. उज्वला चक्रदेव: परिचारिकांच्या वाट्याला येणारे कष्ट आणि त्यांची सहनशीलता ही समाजासाठी अमूल्य आहे. त्यांनी परिचारिकांच्या समर्पणाचे कौतुक केले.डॉ. विलास नंदावडेकर: परिचारिकांनी आता केवळ क्लिनिकल सेवेपुरते मर्यादित न राहता शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रातही आपली मोहोर उमटवावी, असा नवा दृष्टिकोन त्यांनी मांडला.

डॉ. खुशराव बजन: आरोग्यसेवेत व्यावसायिक जबाबदारीसोबतच करुणा आणि नैतिक मूल्यांची जपणूक करणे काळाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.या सोहळ्यामुळे नर्सिंग क्षेत्रात पाऊल ठेवणाऱ्या नवोदित नर्सिंग विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. कुशल, संवेदनशील आणि सामाजिकदृष्ट्या जबाबदार परिचारिका घडविण्याच्या ध्येयाची प्रचिती या कार्यक्रमातून आली अशी माहिती अनिल जायभाये बीडकर यांनी दिली.



# गुरुनानक प्राथमिक विद्यालयात शिवजयंती सोहळा साजरा

बीड ।प्रतिनिधी

श्री विठ्ठल गड शिक्षण प्रसारक मंडळ सारणी सांगवी तालुका केज जिल्हा बीड संचलित गुरुनानक प्राथमिक विद्यालयात स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती विद्यार्थ्यांनी मोठ्या आनंद आणि उत्साहात साजरी केली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेच्या मुख्याध्यापक श्रीमती पवार एस. ए.या होत्या तर प्रमुख मार्गदर्शकाची भूमिका श्रीमती मुंडे एस.व्ही.व श्री गदळे आर. ए. यांनी पार पाडली. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन तांदळे ए. ए.यांनी केले. तर आभार श्रीमती पव्हणे पी. एम.यांनी मानले.शाळेतील विद्यार्थ्यांनी शिवचरित्राच्या विविध पैलूंवर व्यक्त होत अभ्यासपूर्ण प्रकाश टाकला तर काही विद्यार्थिनींनी 'झुलवा पाळणा बाळ शिवाजीचा'या गीतावर उत्तम नृत्य सादरीकरण केले. या उत्सवाचे प्रमुख आकर्षण होते छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित नाट्यप्रसंग. श्रीमती डोंगरे यु. एम. यांच्या मार्गदर्शनाखाली सादरीकरण केले.शिवरायांनी स्वराज्याची स्थापना केली ते निष्ठावान मावळ्यांच्या साथीने इयत्ता चौथी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी सावळ्या तांडेल हा मावळा आणि हिरकणीची साहसकथा हुबेहूब साकारली. हे प्रसंग पाहून सर्वजण भारावून गेलेले होते.उपस्थित सर्व विद्यार्थी व पालकांनी विद्यार्थ्यांच्या या प्रयत्नाला दाद दिली. 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' च्या घोषणांनी वातावरण शिवमय झाले होते. व अखेरीस नाटकात सहभागी विद्यार्थ्यांनी केलेल्या शिवगर्जनेमुळे उपस्थितांच्या अंगी चैतन्य संचारले. या कार्यक्रमाचे संपूर्ण व्यवस्थापन श्री ठोकरे एम. व्ही. यांनी केले तर श्रीमती शेळके मॅडम यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

## मुक्रमाबाद येथील कै. डॉ. भाऊसाहेब देशमुख विद्यालयातील केंद्रावर १० वीची परीक्षा कॉपीमुक्त व सुरळीत

मुक्रमाबाद ।प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील कै.डॉ. भाऊसाहेब देशमुख विद्यालयात महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा इयत्ता दहावी (१० वी ) दि.२० मार्च २०२६ बोर्डाच्या परीक्षेला प्रारंभ झाला असुन मराठी भाषेचा पहिला पेपर सुरळीतपणे पार पडला. यावेळी पेपर सुरू होण्याआधी पालकांनीही परिक्षा केंद्राच्या गेटवर हजेरी लावली होती. गोजेगाव,सावरमाळ,आमदापुर,श्री छत्रपती संभाजी विद्यालय व कै.डॉ.भाऊसाहेब देशमुख विद्यालय मुक्रमाबाद येथील सर्व विद्यार्थी कै.डॉ. भाऊसाहेब देशमुख विद्यालय केंद्र क्र.५२३७ या केंद्रावर १४ ब्लॉग मधुन एकूण ३४० पैकी ३२५ विध्यार्थी परीक्षा दिले तर १५ विध्यार्थी अनुपस्थित होते. यावेळी दापका (गुं ) येथील मुख्याध्यापक दिपक जयपालसिंह ठाकुर हे केंद्र प्रमुख म्हणून उपस्थित होते तर बैठे पथकात मुक्रमाबाद येथील केंद्र प्रमुख बसापुरे नागनाथ,गरुडकर साहेब, मंदेवाड साहेब, सोनटक्के साहेब, केंद्रावर यांची प्रमुख उपस्थित होती. तर पोलीस प्रशासनाच्या वतीने सापोनि राजु चव्हाण व पोलीस उपनिरीक्षक शंकरराव मोरे

यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. बिट जमादार शिवाजी आडेकर व पोलीस कर्मचारी दिपक देवकत्ते सहीत गृहरक्षक दलाचे महीला पुरुष कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.



# गंगाबाई शिंदे यांचे निधन

## पत्रकार वसुदेव शिंदे यांना मातृशोक

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

श्रीमती गंगाबाई नानाभाऊ शिंदे (वय १०४) रा. होळ यांचे दि.२० फेब्रुवारी दुपारी एक वा. वृद्धापकाळाने निधन झाले.गंगाबाई शिंदे या गेल्या दोन महिन्यांपासून आजारी होत्या.दि. २० फेब्रुवारी दुपारी एक वाजता त्यांची अखेर प्राण ज्योत मालवली. त्या पत्रकार वसुदेव शिंदे यांच्या मातोश्री होत्या.

स्व.गंगाबाई यांच्या पार्थिवावर मौजे होळ येथील स्वतःच्या शेतामध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी होळ येथील ग्रामस्थ व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.गंगाबाई यांच्या पश्चात



तीन मुले संदिपान, वसुदेव,श्रीकिशन व गवळण,उषा या दोन मुली,सुना,नातवंडे, पतवंडे,असा मोठा परिवार आहे. पत्रकार वसुदेव शिंदे यांच्या त्या मातोश्री होत्या. शिंदे परिवारावर कोसळलेल्या दुःखात दैनिक समर्थ राजयोग परिवार सहभागी आहे.

# मुंबईत पर्यावरण विभागाचा 'माझी वसुंधरा' राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा थाटात संपन्न

## पर्यावरणविषयक मोहिमेची कृषि क्षेत्राशी सांगड घालावी - राज्यपाल आचार्य देवव्रत
## माझी वसुंधरा' अभियान लोकचळवळ व्हावी - ना.सुनेत्रा पवार
## शाश्वत विकासातुन सक्षम महाराष्ट्र घडवू - ना. पंकजाताई मुंडे

मुंबई।प्रतिनिधी

पर्यावरण रक्षणासाठी माझी वसुंधरा अभियानाच्या माध्यमातून सुरु असलेले कार्य अत्यंत कौतुकास्पद आहे. माझी वसुंधरा अभियानाला आता लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त आहे. भावी पिढीच्या निरोगी आयुष्यासाठी जनसामान्यांच्या मदतीने हाती घेतलेले हे ईश्वरीय कार्य आहे, असे उद्गार राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी काढले. रासायनिक शेती, पर्यावरणीय बदल आरोग्यासाठी घातक असून या अभियानाची कृषि क्षेत्राशी सांगड घालण्याची गरज अधोरेखित करून नैसर्गिक शेतीचा पुरस्कार करण्याचे आवाहन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी यावेळी केले.

वरळी एनएससीआय डोम, सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम येथे पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने आयोजित माझी वसुंधरा राज्यस्तरीय सन्मान सोहळा राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग मंत्री पंकजाताई मुंडे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी माझी वसुंधरा मिशन ४.० आणि ५.० अंतर्गत राज्यस्तरीय पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.पर्यावरणासाठी शासन स्तरावर पहिल्यांदाच एवढ्या व्यापक प्रमाणात आणि प्रभावी पद्धतीने मोहिम राबविल्याबद्दल पर्यावरण आणि वातावरणीय बदल मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांचे राज्यपाल श्री. देवव्रत यांनी अभिनंदन केले.

माझी वसुंधरा' अभियान लोकचळवळ व्हावी - उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

पृथ्वी, वायू, जल, अग्नि आणि आकाश या पंचतत्त्वांचं जतन करणं आपली संस्कृती आणि कर्तव्य आहे. हवामान बदलाचं संकट आपल्यासमोर




उभं असताना 'माझी वसुंधरा' अभियानाच्या माध्यमातून केलेली वृक्षारोपण, घनकचरा व्यवस्थापन आणि जलसंधारणाची कामे कौतुकास्पद आहेत. 'माझी वसुंधरा' हे अभियान नाही तर लोकचळवळ झाली पाहिजे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केलं.


शाश्वत विकासातुन सक्षम महाराष्ट्र घडवू - पंकजाताई मुंडे

महाराष्ट्राचा विकास पर्यावरणपूरक आणि दीर्घकालीन दृष्टीकोनावर आधारित असला पाहिजे. यासाठी नियोजनबद्ध कृती, संस्थात्मक बळकटी आणि लोकसहभाग यांच्या माध्यमातून आपण शाश्वत विकासातून सक्षम महाराष्ट्र घडविण्यास कटिबद्ध आहोत, असे प्रतिपादन पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजाताई मुंडे यांनी केले.

या प्रसंगी माझी वसुंधरा अभियानावर आधारित माहितीपट सादर करण्यात आला. तसेच अभियानातील यशोगाथांवर आधारित कॉफी टेबल बुक आणि द क्लायमेट चेंज लेक्सिकॉन (मराठी-इंग्रजी पर्यावरण शब्दकोश) यांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

विविध पुरस्कार प्रदान

याप्रसंगी राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाचे पुरस्कार - ग्रामपंचायत (एकूण १८ स्थानिक संस्था), राज्यस्तरीय द्वितीय, तृतीय, उंच उडी आणि उत्तेजनार्थ पुरस्कार (एकूण ४५), राज्यस्तरीय द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पुरस्कार (एकूण ३४ स्थानिक स्वराज्य संस्था) नगर परिषद व नगर पंचायत गट यांना पुरस्कारांनी संस्था आणि अधिकाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.



## तालुका कृषी अधिकारीपदी निवड झाल्याबद्दल निलेशकुमार गव्हाणे यांचा पारगाव सिरस ग्रामस्थांच्या वतीने भव्य नागरी सत्कार संपन्न

बीड ।प्रतिनिधी

पारगाव सिरसचे भूमिपुत्र निलेश कुमार गव्हाणे हे तालुका कृषी अधिकारी वर्ग दोनचे अधिकारी झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा भव्य दिव्य नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच यांच्यासह गावातील सर्व प्रतिष्ठित नागरिक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.


दिनांक २१ फेब्रुवारी २०२६ रोजी पारगांव सिरस येथे भव्य नागरी सत्कार संपन्न झाला गावकऱ्याच्या वतीने वाजत गाजत गावामध्ये भव्य मिरवणूक काढण्यात आली. महिलांनी औक्षण करून आपल्या लाडक्या भूमिपुत्राचा शाळेच्या व गावकऱ्यांच्या वतीने सत्कार संपन्न करण्यात आला. या कार्यक्रमाला पारगाव सिरसचे सरपंच सौ जानका ताई दिनकर जमदाडे सरपंच व राष्ट्रवादी कॉंग्रेस युवक जिल्हाउपाध्यक्ष श्रीकांत नाना नवले यांनी भूमिपुत्राचा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख्याने जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक उदमुले सर यांनी प्रास्ताविक भाषण केले. यावेळेस सौ ठोंबरे मॅडम यांनी आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमास वाघमारे सर, बबन खोड, अशोक नवले टेलर, पिराजी बहीर,उबाळे साहेब, ठोंबरे सर, रावसाहेब गव्हाणे सर, श्रीहरी गव्हाणे, युवा नेते दत्ता काशीद,रंगनाथ गव्हाणे दुकानदार हे कार्यक्रमाला उपस्थित होते.

# आता महाराष्ट्रासह २३ राज्यांमध्ये सुरु होणार एसआयआर प्रक्रिया

नवी दिल्ली (प्रतिनिधी)

भारतीय निवडणूक आयोगाने देशभरात विशेष सघन सुधारणा जाहीर केली आहे. एसआयआर प्रक्रिया १२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सुरू आहे. उर्वरित २३ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश आता एसआयआर करतील. निवडणूक आयोगाने सर्व २३ राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना पत्र लिहून एसआयआर ची तयारी सुरू करण्यास सांगितले आहे. एसआयआर १ एप्रिल २०२६ रोजी सुरू होण्याची अपेक्षा आहे.

एसआयआर आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, चंदीगड, दादरा आणि नगर हवेली, दमण आणि दीव, हरियाणा, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि



काश्मीर, झारखंड, कर्नाटक, लडाख, महाराष्ट्र, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, दिल्ली, ओडिशा, पंजाब, सिक्कीम, त्रिपुरा, तेलंगणा आणि उत्तराखंड येथे आयोजित केले जाईल.

यापूर्वी, एसआयआर बिहारमध्ये आयोजित केले गेले आहे. अंदमान आणि निकोबार, छत्तीसगड, गोवा, गुजरात, केरळ, लक्षद्वीप, मध्य प्रदेश, पुद्दुचेरी, राजस्थान, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू येथे एसआयआर सुरू आहे.भारतीय निवडणूक आयोगाने १९५१ ते २००४ दरम्यान देशभरात आठ वेळा एसआयआर एसआयआर आयोजित केला जात आहे.

देशभरातील मतदार याद्या अद्ययावत करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. भारतीय इतिहास पुस्तके एसआयआरचा उद्देश प्रत्येक राज्यातील मतदार यादीत नवीन मतदार जोडणे, मृत मतदारांची नावे काढून टाकणे, बेकायदेशीर मतदारांची ओळख पटवणे आणि एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित झालेल्या मतदारांना काढून टाकणे हा आहे. फसवणूक रोखणे आणि बनावट मतदारांची नावे काढून टाकणे ही सर्वोच्च प्राथमिकता आहे.

# विमानतळावरील सीसीटीव्ही फुटेज देण्यास केंद्राचा नकार

बारामती: दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बारामती येथे विमान अपघाताच्या आधीचे विमानतळावरील सीसीटीव्ही फुटेज माहिती अधिकार कायद्यांतर्गत (ठढख) देण्यास केंद्रीय नागरी सुरक्षा वाहतूक विभागाने स्पष्ट नकार दिला आहे. या निर्णयामुळे अपघाताच्या संशयाची सुई अधिक गडद झाली असून राजकीय वर्तुळात उलट-सुलट चर्चांना उधाण आले आहे.



बारामती येथील माहिती अधिकार कार्यकर्ते नितीन यादव यांनी १० फेब्रुवारी रोजी अर्ज दाखल केला होता. यामध्ये त्यांनी २८ जानेवारी २०२६ रोजी मुंबई विमानतळावरील पहाटे ६ ते सकाळी ९ या वेळेतील सीसीटीव्ही फुटेजची मागणी केली होती. अजित पवार यांच्या विमानाला झालेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर वस्तुस्थिती समोर यावी, हा यामागचा उद्देश होता. मात्र, केंद्रीय विभागाने सुरक्षेच्या कारणास्तव ही माहिती देण्यास असमर्थता दर्शवत अर्ज फेटाळून लावला आहे.

अर्ज फेटाळल्यानंतर नितीन यादव यांनी न्यायालयात धाव घेतली आहे. वारंवार पाठपुरावा करूनही महत्त्वाची माहिती नाकारली जात आहे. जर काही लपवण्यासारखे नसेल, तर फुटेज का दिले जात नाही? यामुळे अजितदादांचा खरोखरच घातपात झाला का? हा प्रश्न आता अधिक गंभीर झाला आहे, असे यादव यांनी म्हटले आहे.

# साई निर्माण शैक्षणिक संकुलात शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी; विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## शिवचरित्राच्या आचरणातूनच घडेल समर्थ राष्ट्र; पदवीपेक्षा चारित्र्य महत्त्वाचे! - युवा शिवव्याख्याते प्रफुल्ल खपके

शिवरायांचे विचार, हेच आमचे संस्कार! शिर्डी (प्रतिनिधी)

शिर्डी येथील श्री साई निर्माण शैक्षणिक संकुलात' (साई निर्माण इंग्लिश मीडियम स्कूल व साई निर्माण ज्युनियर कॉलेज) आज महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. केवळ इतिहासाच्या पुस्तकात अडकून न राहता, युवकांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचे आणि मूल्यांचे प्रत्यक्ष जीवनात आचरण केले, तरच खऱ्या अर्थाने राष्ट्रनिर्मिती घडेल. आजच्या तरुणाला केवळ पदवीधर होऊन चालणार नाही, तर चारित्र्यसंपन्न आणि जबाबदार नागरिक बनण्याची गरज आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध युवा शिवव्याख्याते प्रफुल्ल प्रकाश खपके यांनी केले.ते छत्रपती शिवाजी महाराज - युवकांचे प्रेरणास्थान या विषयावरील विशेष व्याख्यानात बोलत होते.

मान्यवरांची उपस्थिती आणि शिवआरती:या कार्यक्रमासाठी साई निर्माण शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सन्माननीय विजयभाऊ कोते पाटील आणि उपाध्यक्ष श्री. ताराचंदभाऊ कोते पाटील यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरतीने व प्रतिमा पूजनाने करण्यात आली. त्यानंतर सुहास भालेराव सर यांनी प्रास्ताविकात शिवविचारांवर आधारित अत्यंत सुंदर कविता सादर करून वातावरणात नवचैतन्य निर्माण केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी



दिलीप चाफेकर सर होते, तर प्रमुख अतिथी म्हणून ग्रीन फाउंडेशनचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष व पत्रकार तुषार संजय महाजन उपस्थित होते. याप्रसंगी मंचावर साई निर्माण इंग्लिश मीडियम स्कूलचे मुख्याध्यापक माननीय श्री. संदीप डांगे सर, कॉलेजचे प्राचार्य माननीय श्री. राम ढगे सर, अरबाज पठाण सर, नवनाथ वाणी सर, ज्ञानेश्वर चौधरी सर, रवि कोते सर आदी मान्यवर उपस्थित होते.

मावळ्यांचे बलिदान आणि रयतेचे राज्य:प्रमुख प्रवक्ते प्रफुल्ल खपके यांनी आपल्या ओघवत्या वाणीतून शिवरायांच्या जीवनातील अनेक प्रसंग उलगडले. महाराजांनी कशाप्रकारे आपले स्वराज्य स्थापन केले आणि त्यासाठी किती मावळ्यांनी बलिदान दिले, हे अत्यंत सोप्या व प्रभावी भाषेत सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली.

स्वराज्यातील नैतिक मूल्यांवर प्रकाश टाकताना ते म्हणाले की, स्वराज्यात परस्त्रीला मातेसमान मानले जाई. शेतकऱ्याच्या भाजीच्या देठालाही हात लावू नका, असे सक्त आदेश महाराजांनी सैन्याला दिले होते. यामागे रयतेविषयीची कणव दिसून येते. पोटाची खळगी भरली की पाठीचा कणा ताठ राहतो, हे महाराजांनी ओळखले होते. स्वराज्य संकल्पक शहाजीराजे आणि राजमाता जिजाऊंनी बालशिवबांवर केलेले संस्कार हेच स्वराज्याच्या उभारणीचे मूळ असल्याचे त्यांनी नमूद केले.

उत्कृष्ट नियोजन व सांगता:

या शानदार कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. अर्चना तुंबारे मॅडम, सौ. राणी पगार मॅडम आणि सौ. पुजा झोटिंग मॅडम यांनी अतिशय बहारदारपणे केले. तर, कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सौ. पूनम डांगे मॅडम यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सर्व शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष सहकार्य केले. विद्यार्थ्यांच्या 'जय भवानी, जय शिवाजी'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

श्री साई निर्माण शैक्षणिक संकुलात' (साई निर्माण इंग्लिश मीडियम स्कूल व साई निर्माण ज्युनियर कॉलेज) आज महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. केवळ इतिहासाच्या पुस्तकात अडकून न राहता, युवकांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचे आणि मूल्यांचे प्रत्यक्ष जीवनात आचरण केले,



## अहिल्यानगर हादरले अल्पवयीन मुलीचं अपहरण करुन जंगलात पाच दिवस केले अत्याचार ;तीन आरोपींना अटक

अहिल्यानगर/प्रतिनिधी

अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर बलात्कार करण्यात आला. ही घटना अहिल्यानगरच्या राहुरी तालुक्यात घडली. १५ वर्षीय मुलीचं अपहरण करून तिला ५ दिवस जंगलात ठेवले आणि आरोपीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. पोलिसांनी आरोपीच्या मुसक्या आवळत पीडित मुलीची सुटका केली. या घटनेमुळे अहिल्यानगर हादरले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १३ फेब्रुवारी रोजी राहुरी पोलिस ठाण्यात अल्पवयीन मुलीच्या अपहरणाप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी या प्रकरणी तपासाची चक्रे फिरवत आरोपींना अटक केली. ५ दिवसांनंतर नाशिक-सुरत रोडजवळ रामशेज किल्ला परिसरातील जंगलातून मुलीची सुटका करण्यात आली. या प्रकरणी पोलिसांकडून मुख्य आरोपीसह तिघांना अटक करण्यात आली आहे.१३ फेब्रुवारी रोजी कॉलेजला जाते असं सांगून घराबाहेर पडलेली १५ वर्षीय मुलगी घरी परत आलीच नाही. पालकांनी तात्काळ राहुरी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. घटनेचा गांभीर्य लक्षात घेत पोलिसांनी तपास सुरू केला. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक विश्लेषण, मोबाईल लोकेशन ट्रॅकिंग आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी तपासाची सूत्रं वेगाने हलवली. नाशिक जिल्ह्यातील जंगल परिसरातून मुलीची सुटका करण्यात पोलिसांना यश मिळालं.

या प्रकरणात मुख्य आरोपीसह तिघांविरोधात गुन्हा दाखल करत पोलिसांनी त्यांना अटक केली. पीडितेच्या जबाबानुसार पॉक्सो आणि लैंगिक अत्याचाराचे गुन्हे दाखल करण्यात आले असून अधिक तपास राहुरी पोलिस करत आहेत. या घटनेच्या निषेधार्थ संबंधित मुलीच्या गावात बंद ठेवण्यात आला होता. पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# टाटा ट्रस्ट्स व आयआयएसईआर पुणे प्रतिनिधींची अंभोरा शाळेला प्रेरणादायी सदिच्छा भेट

आष्टी - (प्रतिनिधी)

शुक्रवार दिनांक २० फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, अंभोरा (ता. आष्टी, जि. बीड) येथे टाटा ट्रस्ट्स चे राष्ट्रीय समन्वयक तथा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर शिक्षण क्षेत्रात कार्यरत शिक्षण सल्लागार मा. किशोर दरक सर यांनी सदिच्छा भेट दिली. यांच्यासमवेत आयआयएसईआर पुणे येथील आय राईज प्रकल्पाच्या समन्वयक मा. जहिदा शेख मॅडम व मा. नीरजा मॅडम उपस्थित होत्या.



या भेटीदरम्यान मान्यवरांनी शाळेतील विविध शैक्षणिक उपक्रमांची सखोल पाहणी केली. विद्यार्थ्यांनी तयार केलेले फाईल स्वरूपातील पोर्टफोलिओ, प्रकल्पाधारित शिक्षणाची उदाहरणे तसेच शिक्षकांचे प्रत्यक्ष अध्यापन-पाठ यांचे बारकाईने निरीक्षण करण्यात आले. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांच्या संकल्पना, विज्ञानावरील कुतूहल आणि आत्मविश्वास यांचे कौतुक करण्यात आले.

विद्यार्थ्यांसोबत झालेल्या मनमोकळ्या शैक्षणिक गप्पांमुळे शाळेतील वातावरण अधिक उत्साही व प्रेरणादायी झाले. शिक्षकांच्या अध्यापन पद्धती, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षण प्रक्रियेचे विशेष कौतुक करण्यात आले. पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी काही मोलाच्या सूचना देत शाळेच्या गुणवत्तावृद्धीसाठी मार्गदर्शन करण्यात आले. शिक्षण प्रक्रियेत विज्ञानाधारित विचारसरणी आणि प्रयोगशीलता वाढविण्यावर भर देण्याचे आवाहनही करण्यात आले. यावेळी शाळेच्या सुरू असलेल्या बांधकामाबाबत सविस्तर चर्चा झाली.

अंभोरा गावातील ग्रामस्थांनी शाळेच्या विकासासाठी दिलेल्या योगदानाबद्दल मान्यवरांनी विशेष प्रशंसा व्यक्त केली. गावकऱ्यांच्या सहभागातून उभा राहत असलेला शैक्षणिक विकास हा आदर्शवत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक अशोक शिंदे तसेच सर्व शिक्षक उपस्थित होते. मान्यवरांच्या भेटीमुळे शिक्षकवर्ग व विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून ही भेट सर्वांसाठी प्रेरणादायी पर्वणी ठरली. लवकरच सर्वांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांसाठी आयसर भेटीचे आयोजन करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला. मान्यवरांनी दिलेल्या अमूल्य वेळेबद्दल व मार्गदर्शनाबद्दल शाळेच्या वतीने मन:पूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. चला, विज्ञान जगुया! या प्रेरणादायी संदेशासह ही भेट शाळेच्या प्रगतीपथावरील आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरली.

# ३६ वर्षांची अखंड सेवा पूर्ण;प्रा.डॉ.एस.एन.वाघुले यांचा २८ फेब्रुवारीला सेवापूर्ती सोहळा

आष्टी - (राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील कडा येथील आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय येथील उपप्राचार्य तथा वाणिज्य विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. एन. वाघुले हे शनिवार दि. २८ फेब्रुवारी रोजी प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या सेवापूर्ती निमित्त महाविद्यालयात विशेष सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.



या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी शिक्षणमहर्षी माजी आ. भीमराव धोंडे, संस्थापक अध्यक्ष, आनंद चॅरिटेबल संस्था हे राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सहसचिव डॉ. अजय दादा धोंडे व कोषाध्यक्ष अभयराजे धोंडे उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी दिली.

प्रा. डॉ. वाघुले हे महाविद्यालयाच्या स्थापनेपासूनच वाणिज्य विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. तब्बल ३६ वर्षांच्या अखंड सेवाकाळात त्यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी आणि सर्वांगीण प्रगतीसाठी भरीव योगदान दिले. प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी जिद्दीने व समर्पणभावाने कार्य करत विभाग उभा केला. त्यांच्या नेतृत्वाखाली वाणिज्य विभागाने अनेक शैक्षणिक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना सक्षम मार्गदर्शन दिले. शिस्तप्रिय, कर्तव्यनिष्ठ आणि विद्यार्थ्यांविषयी अपार तळमळ असलेले प्रा. वाघुले हे आदर्श शिक्षक म्हणून ओळखले जातात. प्राध्यापक हा समाजपरिवर्तनाचा महत्त्वाचा घटक असतो, याची प्रचिती त्यांच्या कार्यातून सतत आली.

भविष्यातील विचारवंत, कलाकार, लेखक, तत्त्वज्ञ, डॉक्टर, अभियंते, पत्रकार आणि पुढारी घडविण्याचे सामर्थ्य शिक्षकांमध्ये असते. जसा कुंभार मातीच्या गोळ्याला आकार देऊन सुंदर प्रतिकृती घडवतो, त्याचप्रमाणे शिक्षक विद्यार्थ्यांच्या कोऱ्या मनावर योग्य संस्कार करून जबाबदार नागरिक घडवतात ही भूमिका त्यांनी आयुष्यभर जपली. आई-वडिलांनंतर शिक्षक हे विद्यार्थ्यांचे अप्रत्यक्ष पालक असतात, ही भावना त्यांनी कृतीतून दाखवून दिली. त्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान दिले नाही, तर विद्यार्थ्यांना जीवनमूल्ये, संस्कार, परंपरा आणि आदराची शिकवण दिली. आजही माजी विद्यार्थ्यांची ख्याली-खुशाली प्रेमाने विचारणे, आरोग्याबाबत सतत मार्गदर्शन करणे आणि हसतमुखाने संवाद साधणे हे त्यांच्या स्वभाव वैशिष्ट्यांपैकी आहे. कोणताही भेदभाव न करता गरीब-श्रीमंत सर्व विद्यार्थ्यांशी समानतेने वागणे ही त्यांची मोठी जमेची बाजू राहिली आहे. प्रा. डॉ. एस. एन. वाघुले यांच्या सेवापूर्ती सोहळ्यास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी तसेच माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे,

# शेतकऱ्यांचा आवाज आणि शिक्षणमहर्षी-माजी आ.भीमराव धोंडे

## शेतकऱ्यांचे हित जोपासणारे बहुआयामी नेतृत्व

**आष्टी - (राजेंद्र लाड) नवे तंत्रज्ञान, नवे विचार आणि समृद्ध शेतीकडे वाटचाल या ध्येयवाक्याने प्रेरित होऊन माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेले मराठवाड्यातील सर्वात मोठे डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन (वर्ष - ३ रे) दि. १९ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत भव्य स्वरूपात संपन्न होत आहे. पाच दिवस चालणारे हे प्रदर्शन शेतकरी, कृषी तज्ज्ञ, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी ज्ञान, तंत्रज्ञान आणि नव्या संधींचे प्रभावी व्यासपीठ ठरत आहे.**

हे राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ संलग्न आनंद चॅरिटेबल संस्था, आष्टी संचलित श्री. छत्रपती, शाहू, फुले, आंबेडकर कृषी महाविद्यालय, आष्टी यांच्या वतीने आयोजित करण्यात आले आहे. पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयासमोर, नगर-जामखेड रोड, आष्टी, ता. आष्टी, जि. बीड येथे हे भव्य प्रदर्शन भरविण्यात आले आहे. विविध शासकीय विभाग, कृषी कंपन्या, स्वयंसेवी संस्था आणि प्रगत शेतकरी यांचे स्टॉल शेतकऱ्यांसाठी विशेष आकर्षण ठरत आहेत.

या प्रदर्शनामध्ये आधुनिक शेती तंत्रज्ञान, जलव्यवस्थापन, बदलती पीकपद्धती, सेंद्रिय शेती, पशुसंवर्धन, कृषी प्रक्रिया उद्योग, पिकविमा योजना, शासकीय अनुदाने आणि कृषी क्षेत्रातील नवकल्पना याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले जात आहे. मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी हे प्रदर्शन म्हणजे ज्ञानाचा खजिना ठरत असून मोठ्या संख्येने शेतकरी बांधव याचा लाभ घेत आहेत. आष्टी तालुक्यासह संपूर्ण बीड जिल्ह्यासाठी ही अभिमानाची बाब मानली जात आहे.

माजी आ. भीमराव धोंडे यांचे कार्य केवळ राजकीय पदापुरते मर्यादित नसून ते शेतकऱ्यांच्या हक्कांसाठीच्या बांधिलकीतून प्रेरित आहे. त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे निवडणूक राजकारणाच्या चौकटीतून न पाहता प्रत्यक्ष पदयात्रा, मोर्चे आणि जनसंपर्काच्या माध्यमातून गावोगावी जाऊन अडचणी जाणून घेतल्या. शेतमालाला योग्य हमीभाव मिळावा, पिकविमा योजना प्रभावीपणे राबवाव्यात, दुष्काळग्रस्त भागांना तातडीची मदत मिळावी आणि कर्जबाजारी शेतकऱ्यांना दिलासा मिळावा यासाठी त्यांनी सातत्याने आवाज उठविला. त्यांच्या नेतृत्वाखाली काढलेले मोर्चे केवळ घोषणांपुरते मर्यादित न राहता प्रशासनाशी थेट संवाद साधणारे ठरले. शेतकऱ्यांच्या मागण्या लेखी स्वरूपात सादर करून संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचविणे, निर्णयप्रक्रियेवर सकारात्मक दबाव निर्माण करणे



आणि प्रश्नांचा पाठपुरावा करणे ही त्यांच्या कार्यशैलीची वैशिष्ट्ये ठरली. त्यामुळे अनेक प्रलंबित प्रश्नांना गती मिळाली. त्यांनी शेतकऱ्यांना केवळ लाभार्थी म्हणून नव्हे, तर निर्णयप्रक्रियेतील महत्त्वाचा घटक म्हणून स्थान मिळवून देण्याचा प्रयत्न केला. शेतकरी हा समाजाचा कणा आहे या भूमिकेतून त्यांनी त्यांचा आवाज बुलंद ठेवला.

माजी आ. धोंडे यांनी आंदोलनासोबतच ग्रामीण विकासकामांनाही प्राधान्य दिले. रस्ते, पाणीपुरवठा, सिंचन व्यवस्था आणि इतर पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. कारण शेतकऱ्यांचा खरा विकास हा केवळ कर्जमाफी किंवा अनुदानावर अवलंबून नसून दीर्घकालीन सुविधा सक्षम करण्यावर आधारित असतो, ही त्यांची भूमिका स्पष्ट दिसून येते. सोशल मीडियावरून होणाऱ्या टीकेला उत्तर देताना त्यांनी प्रत्यक्ष कार्यावर भर दिला. नेतृत्व म्हणजे प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या प्रश्नांशी जोडलेली कृती, हे त्यांनी आपल्या कामातून दाखवून दिले.

शेतकऱ्यांची मुले शिकली पाहिजेत, उच्च शिक्षण घेतले पाहिजे, नोकरीला लागली पाहिजेत आणि संस्कारक्षम नागरिक बनली पाहिजेत या उदात्त हेतूने त्यांनी शेतकरी शिक्षण संस्था स्थापन केली. ग्रामीण भागात शिक्षणाचे जाळे उभे करून विविध अभ्यासक्रम सुरू करण्यात आले. आज या संस्थेमधून शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रांत उच्च पदांवर कार्यरत आहेत. विशेष म्हणजे या संस्थेमुळे शेतकऱ्यांची मुले शिक्षणाच्या प्रवाहात आली, जवळच शैक्षणिक सुविधा उपलब्ध झाल्यामुळे अनेक कुटुंबांची प्रगती झाली. याचे संपूर्ण श्रेय माजी आ. भीमराव धोंडे यांना दिले जाते. म्हणूनच त्यांना शिक्षणमहर्षी म्हणून गौरविले जाते. संस्थेचे नाव आणि लोगोही शेतकऱ्यांप्रती आदरभाव व्यक्त करणारा आहे. एकूणच, माजी आ. भीमराव धोंडे यांचे कार्य हे सत्ता आणि पदापलीकडे जाऊन शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी आणि ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी समर्पित आहे. कृषी प्रदर्शनासारख्या उपक्रमातून त्यांनी शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून दिली, तर शिक्षण संस्थांमधून शेतकऱ्यांच्या पुढील पिढीला उज्ज्वल भविष्याचा मार्ग खुला केला. शेतकऱ्यांचा आवाज म्हणून ओळखले जाणारे आणि शिक्षणमहर्षी म्हणून गौरविले जाणारे साहेब पुढील काळातही शेतकरी हितासाठी कार्यरत राहोत, त्यांना उत्तम आरोग्य व दीर्घायुष्य लाभो, हीच पांडुरंग चरणी प्रार्थना.

# आष्टीत भव्य शिवजयंती महोत्सव संपन्न सांस्कृतिक,शैक्षणिक कार्यक्रमांनी शहर दुमदुमले

आष्टी - (प्रतिनिधी) हिंदवी स्वराज्याचे संस्थापक व राष्ट्राभिमानाची प्रेरणा देणारे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आष्टी येथे शिवजयंती महोत्सव २०२६ मोठ्या उत्साहात व दिमाखात साजरा करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौक, आष्टी येथे विविध शैक्षणिक, सांस्कृतिक आणि पारंपरिक कार्यक्रमांचे आयोजन करून शहरात देशभक्तीचा व अभिमानाचा जागर करण्यात आला.



महोत्सवाची सुरुवात मंगळवार दि. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता गट १ ली ते ५ वी विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व स्पर्धेने झाली. तालुक्यातील सुमारे २५ शाळांमधील ४० विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवून शिवचरित्रावर प्रभावी भाषणे सादर केली. या गटातील विजेते विद्यार्थी पुढीलप्रमाणे - प्रथम क्रमांक - प्रांजल सुनील रेडेकर, द्वितीय क्रमांक - मानसी विजय डुकरे, तृतीय क्रमांक - स्वराज बाळासाहेब तळेकर, उत्तेजनार्थ - उमेरा खान. यानंतर बुधवार दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायं. ६.३० वाजता गट ६ वी ते ९ वी विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली. या गटात जवळपास २५ शाळांतील ३५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. शिवाजी महाराजांच्या पराक्रम, स्वराज्य संकल्पना व आदर्श नेतृत्व यांवर विद्यार्थ्यांनी प्रभावी मांडणी केली. या गटातील विजेते पुढीलप्रमाणे - प्रथम क्रमांक - प्रतीक्षा शरद पवार व यशश्री बाळासाहेब सोले, द्वितीय क्रमांक - सृष्टी महेश कदम, तृतीय क्रमांक - तेजस्विनी नितीन शिंदे, उत्तेजनार्थ - संस्कृती गायकवाड व सुमैय्या आतार. या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांना शिवचरित्राचा सखोल परिचय होऊन त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

गुरुवार दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता शिवजयंती दिनानिमित्त शिवध्वजारोहण, प्रतिमा पूजन व बक्षीस वितरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी आ. सुरेश धस, माजी आ. भीमराव धोंडे, माजी आ. बाळासाहेब आजबे, उद्धव बापू दरेकर, सतिश आबा शिंदे, किशोर नाना हंबर्डे, डॉ. शिवाजी राऊत, बद्रीनाथ जगताप, आदिनाथ सानप, दत्ताभाऊ काकडे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. आ. सुरेश धस यांच्या शुभहस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत शिवध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा शिवप्रतिमा व शाल देऊन सन्मान करण्यात आला.

या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे विविध समाजातील गरीब कुटुंबातील दहा गरजू विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सायकल वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला नवी गती मिळणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. सायंकाळी शालेय विद्यार्थ्यांच्या विविध सांस्कृतिक गुणदर्शन कार्यक्रमाने वातावरण भारावून गेले. देशभक्तिपर गीत, नृत्य व शिवचरित्र साकारण्यात आले.

संपूर्ण कार्यक्रमांचे बहारदार सूत्रसंचालन आदर्श शिक्षक बाळासाहेब तळेकर यांनी केले. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून जेष्ठ रंगकर्मी मधुकर सोळसे, रंगकर्मी दिपक शिंदे, प्रसिद्ध कवी हरीश हातवटे आणि सुप्रसिद्ध तबला वादक श्रीम. सुनिता पोकळे यांनी काम पाहिले. उत्कृष्ट निवेदनाबद्दल बाळासाहेब तळेकर तसेच परीक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. संयोजन समितीच्या वतीने सुनिल दादा रेडेकर यांनी कार्यक्रमाची माहिती दिली. शिवजयंती महोत्सवानिमित्त आष्टी शहरात सर्वत्र भगवे ध्वज, आकर्षक सजावट व रोषणाई करण्यात आली होती. सर्वच स्तरातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत छत्रपतींच्या विचारांचा जागर केला. नव्या पिढीत राष्ट्रभक्तीची भावना दृढ व्हावी आणि शिवरायांच्या आदर्शांचा वारसा पुढे चालावा, या उद्देशाने हा महोत्सव यशस्वीरीत्या संपन्न झाला.




# मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर विद्यमान सरपंचच प्रशासक-दत्ताभाऊ काकडे

राज्य सरकारचा ऐतिहासिक निर्णय,सरपंच परिषदेत जल्लोष

आष्टी - (प्रतिनिधी) महाराष्ट्रातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून विद्यमान सरपंचांचीच नियुक्ती करण्याचा ऐतिहासिक व महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला असून, या निर्णयामुळे राज्यभरातील सरपंचांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी काढण्यात आलेल्या राजपत्रानुसार, ज्या ग्रामपंचायतींची मुदत संपली आहे त्या ठिकाणी विद्यमान सरपंचांना प्रशासक म्हणून कामकाज पाहण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. तसेच ग्रामपंचायत सदस्यांना प्रशासकीय समिती म्हणून अधिकार बहाल करण्यात आले आहेत.

राज्यातील तब्बल १४ हजार २३४ ग्रामपंचायतींची मुदत संपल्यानंतर प्रशासक नियुक्तीचा प्रश्न निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर लोकशाही पद्धतीने निवडून आलेल्या प्रतिनिधींनाच जबाबदारी देण्यात यावी, अशी ठाम भूमिका सरपंच परिषद, मुंबई महाराष्ट्र ने घेतली होती. परिषदेकडून राज्य, जिल्हा आणि तालुका स्तरावर सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा करण्यात आला. यासाठी न्यायालयीन स्तरावरही लढा देण्यात आला होता. सरपंच परिषद प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे यांनी या निर्णयाचे स्वागत करत राज्य शासनाचे आभार मानले आहेत. त्यांनी सांगितले की, लोकनियुक्त प्रतिनिधींना बाजूला सारून प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे कारभार सोपविण्याऐवजी, गावच्या परिस्थितीची पूर्ण जाण असलेल्या सरपंचांनाच प्रशासक म्हणून संधी देणे हा लोकशाहीचा सन्मान करणारा निर्णय आहे.

या निर्णयामुळे गावपातळीवरील विकासकामांना गती मिळणार असून, प्रशासकीय अडथळे दूर होणार आहेत. अनुभवी सरपंचांच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायतींचा कारभार अधिक प्रभावी व उत्तरदायी पद्धतीने चालेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. गावाच्या गरजा, प्रलंबित कामे, निधीचा वापर आणि स्थानिक प्रश्न यांची सखोल माहिती असलेले प्रतिनिधी कार्यरत राहिल्याने विकासाची गाडी अखंडितपणे सुरू राहणार आहे.या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे तसेच सरपंचांच्या मागणीला पाठिंबा देणारे आ. श्रीकांत भारतीय, आ. सुरेश धस यांच्यासह राज्यातील ४० आमदारांचे सरपंच परिषदेच्या वतीने आभार मानण्यात आले आहेत.

राज्य सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे ग्रामपंचायत व्यवस्थेला स्थैर्य प्राप्त होणार असून, ग्रामीण विकासाच्या कामांना नवे बळ मिळणार असल्याचे मत ग्रामपंचायत पदाधिकारी आणि सरपंच परिषदेकडून व्यक्त करण्यात आले आहे. राज्यातील विविध भागांत या निर्णयाच्या स्वागतासाठी सरपंच व पदाधिकाऱ्यांकडून आनंदोत्सव साजरा करण्यात येत असून, मिठाई वाटप व अभिनंदन सोहळ्यांद्वारे सरकारचे आभार व्यक्त करण्यात येत आहेत.लोकशाही व्यवस्थेचे संरक्षण करत गावपातळीवरील प्रशासनात सातत्य राखणारा हा निर्णय महाराष्ट्राच्या ग्रामीण प्रशासनाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याची भावना सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे.

# प्रलंबित मागण्यांसाठी भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन

## भोकरदन तहसीलदारांना निवेदन देत शासनावर तीव्र नाराजी

भोकरदन प्रतिनिधी (इसरारखान पठाण)

भूमी अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी राज्यव्यापी कामबंद आंदोलनाला सुरुवात झाली असून त्याच पार्श्वभूमीवर भोकरदन येथील भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी तहसीलदारांना निवेदन सादर करून आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदवला आहे. शासनाच्या उदासीन धोरणाविरोधात कर्मचाऱ्यांचा संताप आता उफाळून आल्याचे चित्र आहे.




५ वर्षांपूर्वीचा न्यायालयीन आदेश आजही धूळखात

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण च-ढ मुंबई नागपूर खंडपीठाने १४ जानेवारी २०२० रोजी भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांना तांत्रिक वेतनश्रेणी लागू करण्याचे स्पष्ट आदेश दिले होते.मात्र तब्बल पाच वर्षे उलटूनही या आदेशाची अंमलबजावणी करण्यात शासनाने अपयश आल्याचा गंभीर आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे.शासनाचे आश्वासन हवेतच कृती आराखडा कागदावरच

४ जून २०२५ रोजी महसूल मंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत १५० दिवसांत मागण्या मान्य करण्याचा कृती आराखडा जाहीर करण्यात आला होता. हा कालावधी संपून तीन महिने उलटले तरीही शासन स्तरावर कोणताही ठोस निर्णय न झाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

कर्मचाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, विभाग आणि शासन स्तरावर केवळ वेळकाढूपणा केला जात असून कर्मचाऱ्यांच्या घटनात्मक हक्कांची सर्रास पायमल्ली होत आहे. वारंवार पाठपुरावा करूनही न्याय मिळत नसल्याने अखेर भूमी अभिलेख कर्मचारी कृती समिती महाराष्ट्र राज्य यांच्या नेतृत्वाखाली कामबंद आंदोलनाचा पवित्रा घेण्यात आला आहे.

मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरू राहणार

भोकरदन तहसीलदारांना निवेदन देताना समाधान सरोदे, दत्ता सातभाई,उमेश चव्हाण, लक्ष्मीकांत रोडसमुद्रे,वैशाली गोर्डे,कमलेश साखळे,राजु बंडा, राहुल अंभोरे,विशाल कावरे, अतुल जोशी यांच्यासह अनेक कर्मचाऱ्यांच्या सह्या आहेत. मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे.कामकाज ठप्प होण्याचा धोका

राज्यभर सुरू असलेल्या कामबंद आंदोलनामुळे भूमी अभिलेख विभागाचे कामकाज ठप्प होण्याची शक्यता असून याचा थेट फटका नागरिकांना बसणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. तरीही शासनाने तातडीने निर्णय घ्यावा अन्यथा आंदोलन आणखी उग्र करण्यात येईल असा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

## भक्तीचा लख्ख प्रकाश ६ वर्षांच्या इकरा शेखचा पहिला रोजा चिमुकल्या हातांनी दिली इमानची साक्ष

अंबड ।प्रतिनिधी

सब्र हीच इबादत आणि रोजा ही आत्म्याची पवित्र परीक्षा रमजान महिन्याचा हा दिव्य संदेश अंबड येथील चिमुकल्या इकरा शेख हिने आपल्या निरागस कृतीतून जगासमोर मांडला आहे. अवघ्या सहा वर्षांच्या या चिमुरडीने कडक उन्हातही आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण करून अल्लाहवरील अपार श्रद्धेचे दर्शन घडवले आहे.निरागस दुवा आणि अढळ विश्वास शेख अजीम यांची कन्या इकरा हिने जेव्हा पहाटेच्या सहरी पासून ते सायंकाळच्या इफ्तार पर्यंत पाण्याचा थेंब आणि अन्नाचा कणही न घेता उपवास धरला तेव्हा तिच्या चेहऱ्यावर एक वेगळाच संयम झळकत होता. तिने आपले छोटेसे हात पसरून जेव्हा अल्लाला आर्त साद घातली या अल्लाह मला रोजा पूर्ण करण्याची ताकद दे तेव्हा तिच्या त्या निरागस प्रार्थनेने उपस्थितांच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे केले. तिच्या प्रत्येक श्वासात अल्लाह मला पाहत आहे ही भावना तिच्या इमानची साक्ष देत होती.

भक्तीमय वातावरणात रंगला इफ्तार

सूर्यास्ताच्या वेळी जेव्हा इफ्तारची वेळ झाली तेव्हा शेख परिवारात भक्ती आणि प्रेमाने भरुन आले होते.घरातील मोठ्यांनी इकराच्या या धैर्याचे कौतुक करत तिच्यावर प्रेमाचा वर्षाव केला.तिला विविध भेटवस्तू देऊन तिचा उत्साह वाढवण्यात आला.इकराच्या चेहऱ्यावरचे ते समाधान केवळ उपवास सुटल्याचे नव्हते तर अल्लाच्या सान्निध्यात एक कठीण परीक्षा यशस्वीपणे पार पाडल्याचा आनंद होता.

रोजा म्हणजे केवळ भूक आणि तहान सहन करणे नव्हे तर तो आत्म्याला शुद्ध करण्याचा आणि अल्लाच्या जवळ जाण्याचा मार्ग आहे. इकराने या वयात दाखवलेली ही ओढ म्हणजे संस्कारांचे पवित्र बीजारोपण आहे.

संयम आणि संस्कारांची प्रेरणा



इकरा शेखचा हा पहिला रोजा केवळ एक धार्मिक विधी न ठरता श्रद्धा,संयम आणि संस्कारांचा एक वस्तुपाठ ठरला आहे.आजच्या युगात जिथे चंचलता वाढली आहे तिथे सहा वर्षांच्या बालिकेने दाखवलेली ही सोशिकता अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

लहानशा ओठांवर अल्लाहचे नाव आणि मनात श्रद्धेचा उजळ भाव घेऊन इकराने आपल्या जीवनातील इमानची पहिली साक्ष दिली आहे. तिचे हे पाऊल भविष्यात नैतिकतेच्या आणि मानवतेच्या प्रकाशाने उजळत राहो हीच प्रार्थना संपूर्ण परिसरातून व्यक्त होत आहे.



अंबड (प्रतिनिधी)

अंबड येथील अब्दल्ला साले चाऊस बामर यांनी आपल्या वयाच्या आठव्या वर्षी पहिला रोजा उपवास संपन्न केला आहे. याबद्दल त्याचे नातेवाईक व परिचितांमधून कौतुक करण्यात येत आहे.इस्लाम धर्म परंपरेप्रमाणे आज दि.१९ फेब्रुवारी पासून पवित्र रमजान महिन्यास प्रारंभ झाला आहे. यानिमित्त महिनाभर संपूर्ण दिवसभर उपवास करण्याची परंपरा आहे. या परंपरेप्रमाणे प्रमाणे अब्दुल्ला चाऊस यांनी आपल्या आयुष्यातील पहिला रोजा आज यशस्वीपणे पूर्ण केला आहे. त्याबद्दल छोटेखानी इफ्तार पार्टी संपन्न करण्यात आली. यावेळी जमील अहमद खान, आजोबा सिजर चाऊस, इरफान चाऊस, नाना सोहेल चाऊस, वडील साले बामर, काका फैसल बामर, शेख शकील, अक्रम काजी, नासेर बामर, अमर बाशान, मामा सद्दाम चाऊस, सलमान चाऊस आदी उपस्थित होते.

## पाच वर्षांची मरयमनाजची श्रद्धेची परीक्षा पहिला रोजा यशस्वी पूर्ण करत अल्लाहवरील प्रेम व्यक्त

घनसावंगी ।प्रतिनिधी

रमजान हा संयम आत्मशुद्धी आणि अल्लाहवरील अटूट श्रद्धेचा पवित्र महिना.या पवित्र महिन्यात घनसावंगी येथील सरवर सय्यद यांची अवघ्या पाच वर्षांची चिमुकली कन्या मरयमनाज सय्यद हिने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण करून श्रद्धेचा अनोखा आदर्श निर्माण केला आहे.



लहान वय असूनही उपवासाची परीक्षा स्वीकारत तिने दाखवलेली जिद्द,संयम आणि भक्तीभाव पाहून परिसरात कौतुकाचा वर्षाव होत आहे. अल्लाह मला रोजा ठेवायला ताकद देईल या निरागस विश्वासाने मरयमनाजने सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत संयमाने उपवास पाळला.

इफ्तारच्या वेळी कुटुंबीयांनी तिच्यावर प्रेमाचा वर्षाव केला. विविध भेटवस्तू देऊन तिच्या उत्साहात भर घालण्यात आली. या वेळी घरात आनंदाचे वातावरण होते आणि मरयमनाजच्या चेहऱ्यावर समाधान आणि अल्लाहप्रती कृतज्ञतेची झलक दिसत होती.मरयमनाजचा हा पहिला रोजा केवळ उपवास नव्हता तर श्रद्धा,संयम आणि संस्कारांचे बीज रोवणारा एक प्रेरणादायी क्षण ठरला आहे.तिच्या या कृतीमुळे लहान मुलांमध्ये धार्मिक संस्कार,आत्मशिस्त आणि नैतिक मूल्यांचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.चिमुकल्या मरयमनाजची अल्लाहवरील अढळ श्रद्धा आणि भक्तिभाव अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत असून तिच्या पुढील आयुष्यासाठी सर्वत्र शुभेच्छांचा वर्षाव होत आहे

# महाराष्ट्र -कर्नाटक हादरवणारा आंतरराज्य घरफोडी टोळीचा सरगना गोंदी पोलिसांच्या जाळ्यात

## गोंदी पोलिसांनी शहापूर परिसरात सापळा रचून मुसक्या आवळल्या

शहागड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र व कर्नाटक राज्यात घरफोड्या करून दहशत निर्माण करणाऱ्या सराईत अट्टल गुन्हेगाराला गोंदी पोलिसांनी शहापूर परिसरात सापळा रचून जेरबंद केल्याने गुन्हेगारी विश्वात खळबळ उडाली आहे. तब्बल आठ गंभीर गुन्ह्यांमध्ये फरार असलेल्या या कुख्यात आरोपीला १९ फेब्रुवारी रोजी अटक करून पुढील कारवाईसाठी कर्नाटक पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव रवी आन्ना शिंदे (वय २८, रा. नवीन सिरसगाव, ता. अंबड, जि. जालना) असे असून, तो आंतरराज्य घरफोडी टोळीचा मुख्य सूत्रधार असल्याचे पोलिस तपासात स्पष्ट झाले आहे.




बेळगावी जिल्ह्यातील हारुगीरी पोलीस ठाण्यात दाखल घरफोडीच्या गुन्ह्यात तो मुख्य आरोपी होता आणि दीर्घकाळापासून फरारीवर होता.

गोंदी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर यांना आरोपी शहापूर परिसरात असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर गोंदी पोलीस व कर्नाटक पोलिसांच्या संयुक्त पथकाने तात्काळ सापळा रचला. अचूक कारवाई करून आरोपीला पकडण्यात आले, ज्यामुळे पोलिसांच्या गुप्तचर यंत्रणेची कार्यक्षमता पुन्हा एकदा सिद्ध झाली.

गंभीर गुन्ह्यांची भयानक गुन्हेगारी मालिका

या सराईत गुन्हेगारावर विविध जिल्ह्यांत दरोडे, घरफोड्या व हिंसक गुन्ह्यांची लांबलचक नोंद आहे. २०२३ मध्ये बीड येथे कलम ४३९, ३९५, ३९७ २०२२ मध्ये गोंदी (जालना) येथे कलम ३९५, ३९९ २०२२ मध्ये अंबड येथे कलम ३९५ २०२२ मध्ये पुन्हा गोंदी येथे कलम ३९५ २०२४ मध्ये करमाड (छत्रपती संभाजीनगर) येथे कलम ३१०(२), ३०९(५), ३०९(६) २०२१ मध्ये अंबड येथे कलम ३९५ २०२६ मध्ये हारुगीरी (कर्नाटक) येथे घरफोडीचा गुन्हा या सर्व गुन्ह्यांत तो फरारी होता, त्यामुळे त्याला अटक करणे हे पोलिसांसाठी मोठे यश मानले जात आहे.

संयुक्त पोलिस कारवाईचे मोठे यशही धडक कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या कारवाईत सपोनि आशिष खांडेकर, उपनिरीक्षक संतोष मुपडे, शहागड चौकीचे उपनिरीक्षक किरण हावले, हरिदास जंगले, गोपनीय शाखेचे चरणसिंग बामनावत, संतोष डोईफोडे, पो.कॉ. दीपक भोजने, प्रदीप हावळे, गायकवाड, शाकेर सिद्दीकी, सय्यद सलमान तसेच कर्नाटक पोलिसांच्या पथकाने संयुक्तरीत्या सहभाग घेतला.

गुन्हेगारी विश्वाला मोठा धक्का

आंतरराज्य पातळीवर घरफोडी करणाऱ्या या सराईत आरोपीच्या अटकेमुळे गुन्हेगारी टोळीला मोठा धक्का बसला असून पुढील तपासात आणखी गुन्ह्यांचा उलगडा होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

# अंबडमध्ये घुमला शौर्याचा हुंकार शिवकालीन युद्धकलेचा थरार

## सव्यसाची गुरुकुलमच्या रणरागिनी अन् मावळ्यांच्या युद्धकलेने शहरवासीयांचे जिंकली मने

अंबड ।प्रतिनिधी

विजेच्या चपळाईने तळपणारी तलवार हवेत सों -सों फिरणारा दांडपट्टा आणि हर रस महादेव च्या जयघोषात अंबड येथे सादर केलेल्या काठी फिरवणे,तलवारबाजी व दांडपट्ट्याच्या चित्तथरारक प्रात्यक्षिकांनी अंबड शहरवासियांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. शिवकालीन युद्धकलेचे रोमांचक प्रात्यक्षिक सादर करून पारंपरिक कौशल्यांचे दर्शन घडवत,या रणरागिनी आणि मावळ्यांनी उपस्थितांना अक्षरशः भारावून टाकले.

शिवजयंतीनिमित्ताने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन अंबड नगर पालिकेच्यावतीने नगराध्यक्षा सौ.देवयानी केदार कुलकर्णी, नगरसेवक केदार कुलकर्णी यांच्या पुढाकाराने समाजभान टीमचे दादासाहेब थेटे यांच्यामार्फत करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात आ. नारायण कुचे व नगराध्यक्षा सौ.देवयानी कुलकर्णी यांच्या हस्ते तसेच सर्व नगरसेवकांच्या उपस्थितीत शस्त्र पूजनाने करण्यात आली.



यावेळी कोल्हापूरहून आलेल्या सव्यसाची गुरुकुलमच्या चमूने एकापेक्षा एक सरस प्रात्यक्षिके सादर केली.विजेच्या चपळाईने चालवलेली तलवारबाजी,काठी फिरवणे,एक महिलेने चार जणांचा तलवारबाजीने केलेला सामना असे अनेक शौर्यमय प्रात्यक्षिक पाहून नागरिक थक्क झाले.शिवकालीन युद्धकलेतील अत्यंत कठीण मानला जाणारा दांडपट्टा फिरवण्याची कलाकारांची शैली कौतुकास्पद ठरली.पारंपरिक भारतीय युद्धकलेचे तसेच व्यायाम,दंड बैठकाचे विविध प्रकार,सूर्य नमस्कार, चंद्र नमस्कार,भूमी नमस्कार आदीचे यावेळी उत्तम सादररीकरण करण्यात आले.

हा कार्यक्रम केवळ मनोरंजनाचा नव्हे तर तरुण पिढीला आपल्या वैभवशाली इतिहासाची आणि युद्धकलेची ओळख करून देणारा ठरला.त्यामुळे आयोजक म्हणून नगर परिषदेने विशेषतः नगरसेवक केदार कुलकर्णी यांनी घेतलेल्या पुढाकाराचे व परिश्रमाचे शहरात मोठे कौतुक होत आहे.कार्यक्रमाचे सुत्र संचलन शरद मगर व गुरुकुलमची सई सुधन्वा गोंधळेकर यांनी केले.या कार्यक्रमाला उपविभागीय पोलीस अधिकारी सिद्धेश्वर धुमाळ, पोलीस निरीक्षक संतोष घोडके, उपनगराध्यक्ष विश्वजित खरात, नगरसेवक गंगाधर वराडे,धनराज ठाकूर, सुहास सोडाणी,संदिप खरात,सौरभ कुलकर्णी, उज्वल कुचे,बाळू शहाणे,कृष्णा बाबर, दिलीप खरात,बंडू जाधव,फेरोज शेख,अमोल वराडे,सुरेश गुडे, शाहूल खरात, विठ्ठलसिंग राजपूत, अर्जुन भोजने,अफरोज पठाण, जितेंद्र बुर्ले, सचिन खरात आदीसह सर्व नगरसेवक तसेच शहरातील विविध शाळेचे विद्यार्थी, शिक्षक,तरुण व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नगर परिषद तसेच समाजभानच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर अंबड शहरात प्रथमच यावर्षी खऱ्या अर्थाने शिवजयंती साजरी झाली, दरवर्षी असेच प्रेरणादायी कार्यक्रम आयोजित करायला हवेत अशा प्रतिक्रिया ऐकायला मिळाल्या.



# हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

## भालगाव शाळेत शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी

ताड हदगाव ।प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भालगाव येथे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक व रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून शिवजयंती अत्यंत उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, शौर्य व नेतृत्वगुण जागृत करण्यासाठी आयोजित या कार्यक्रमाने संपूर्ण परिसर शिवमय झाला होता.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांसाठी ५० गुणांची प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत श्रद्धा भगवान खंडागळे हिने प्रथम क्रमांक पटकावला अनुष्का भगवान उजेड हिला द्वितीय तर दिव्या किरण साबळे हिला तृतीय क्रमांक मिळाला.तसेच शिवराज हरिभाऊ इंगळे, मानव खांडेभराड,चंचल वाघमारे, काजल वाघमारे,वैष्णवी मुळे, ईश्वरी जाधव,प्रथमेश मस्के आदी विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.

या उपक्रमाचे नियोजन व मार्गदर्शन योग शिक्षक गजानन पांडुरंग पुरी यांनी प्रभावीपणे केले.यावेळी शाळेचे शिस्तप्रिय व विद्यार्थीप्रिय मुख्याध्यापक महावीर शेलार सर,तसेच नरेंद्र रत्नपारखे सर,प्रदीप जाधव सर,पांडुरंग गिरी सर,विठ्ठल पिंपळे सर,सारिखा इंगळे मॅडम, अश्विनी चौधरी मॅडम,शितल वानखेडे मॅडम यांच्यासह शिक्षकवृंदाची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कारभारी मस्के,उपाध्यक्ष दिगंबर जाधव, तसेच किरण साबळे,सुभाष जऱ्हाड,शिक्षणतज्ञ गणेशराव मुळे सर,मा.सरपंच शामसुंदर मुळे,दत्ता जाधव,बाळराजे जाधव,सिद्धेश्वर मुळे,संतोष मुळे,विष्णु सुलताने,राधाकिसन जाधव,मा.सरपंच मच्छिंद्र मस्के यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य शामराव साबळे,अनिल साबळे, मारुती येडे,गणपत इंगळे, विठ्ठल आदलिंगे,कृष्णा मिसाळ, रमेश साबळे आदी मान्यवर उपस्थित होते.विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनकार्य,पराक्रम,स्वराज्य स्थापनेमागील दूरदृष्टी आणि आदर्श नेतृत्वगुण प्रभावीपणे मांडले. देशभक्तीपर गीते, पोवाडे व सांस्कृतिक सादरीकरणांमधून राष्ट्रप्रेमाची भावना जागृत करण्यात आली. शिक्षकांनी ऐतिहासिक संदर्भ देत विद्यार्थ्यांना राष्ट्रनिष्ठा, आदर्श आचरण व सामाजिक जबाबदारीचे महत्त्व पटवून दिले.कार्यक्रमास ग्रामस्थ, पालक,महिलावर्ग,ज्येष्ठ नागरिक,पोलीस पाटील, अंगणवाडी सेविका व आशा कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होते.संपूर्ण कार्यक्रम शांततेत,सुव्यवस्थित व प्रेरणादायी वातावरणात पार पडला.या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम,शौर्य, नेतृत्वगुण व सामाजिक बांधिलकीची जाणीव दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

# पाणी सप्ताह ही काळाची गरज जिल्हाधिकारी कर्डिले

भोकर ।प्रतिनिधी

सध्या ची पाणी पातळी पाहता जलसंधारणावर काम करणे आवश्यक आहे. हरिनाम सप्ताह सोबतच पाणी सप्ताह करणे हि काळाची गरज असून सेवा समर्पण परिवार ने सुरु केलेल्या पाणी सप्ताह ची व्याप्ती निश्चितच वाढत जाईल असे प्रतिपादन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी भोकर तालुक्यातील हाडोळी येथे केले.

जलसंवर्धन व जलजागृती चळवळीला व्यापक रूप प्राप्त होवून ती लोकचळवळ बनावी. गावागावातून जल जागृण व्हावे यासाठी पारंपारीक हरिनाम, शिवनाम सप्ताहाच्या धर्तीवर गावोगाव पाणी सप्ताह व्हावेत हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून सेवा समर्पण परिवार हाडोळी गावात पाणी सप्ताह ची सुरुवात केले. पाणी सप्ताह साजरा करण्याचा राज्यातील हा पहिलाच प्रयोग असून यासाठी सेवा समर्पण परिवार ला प्रशासनाची भक्कम साथ मिळत आहे. या अनोख्या उपक्रमात हजारो हात श्रमदानातून जलसंधारण ची कामे करण्याची सुरुवात झाली आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने सकाळी छत्रपती च्या प्रतिमेचे पूजन करून या पाणी सप्ताहची सुरूवात झाली. उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी सर,




तहसीलदार विनोद गुंडमवार, मुख्याधिकारी ऋषभ पवार, सेवा समर्पण परिवार चे अध्यक्ष दिगंबर देशमुख, वामनराव लालवंडे, ग्रामपंचायत अधिकारी अरविंद मुनगे यांची प्रमुख उपस्थिती होती. पाणी सप्ताह च्या पहिल्या दिवशी मुख्यमंत्री कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी राजेंद्र खंदारे यांनी दुपार च्या सत्रात श्रमदान केले. तर पाणी सप्ताह च्या दुसऱ्या दिवशी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी हाडोळी येथे भेट दिली. यावेळी कर्डिले यांच्या हस्ते वृक्षारोपण, बोअर पुनर्भरण, जलतारा चा शुभारंभ करण्यात आला. काही वेळ कर्डिले यांनी गावकऱ्यांसोबत श्रमदान ही केले. यावेळी उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी, तहसीलदार विनोद गुंडमवार, मुख्याधिकारी ऋषभ पवार यासह सेवा समर्पण परिवार, ग्रामस्थ उपस्थित होते.

हाडोळीत मशाल रॅली

सेवा समर्पण परिवार आयोजित केलेल्या राज्यातील पहिलाच प्रयोग असलेल्या पाणी सप्ताह ची सुरुवात १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांना वंदन करून करण्यात येणार आहे. पाणी सप्ताह च्या पूर्वसंध्येला हाडोळी येथील ग्रामस्थांनी मशाल रॅली काढली. गावातील महिला, जेष्ठ नागरिक, तरूण सहभागी होत जलसंधारणाच्या अनुषंगाने नारे दिले.

# नॅशनल हायवे १६१ वरील सुगाव (बु.) येथील वळण रस्ता ठरतोय धोकादायक

मुखेड ।प्रतिनिधी

नांदेड ते बिदर जाणारा नॅशनल हायवे क्रमांक १६१ या रस्त्याला एकूण २२ वळण असून सुगाव (बु.) येथील वळण फारच धोकादायक असुन या ठिकाणी अनेक अपघात होत आहेत. एखाद्या कुटुंबातील कर्ता व्यक्ती अपघाताने मृत्यू पावला तर याला जबाबदार कोन? अशी चिंता व्यक्त केली जात आहे.बऱ्याच वेळा या अपघाती वळणाचा अंदाज न आल्यामुळे दुर्घटना घडतात. वाहनधारकांना आपला जीव मुठीत धरून वाहने चालवावे लागत असल्याचे पाहायला मिळत आहे.सुगाव (बु) वरील हायवे क्रमांक १६१ च्या लगतच जिल्हा परिषद शाळा असल्यामुळे मुलांना सुद्धा ये जा करण्यासाठी मोठी कसरत करावी लागते आहे. यामुळे पालकांचा अर्धा जीव मुलांमध्ये तर तर अर्धा जीव रोजंदारी मध्ये अडकला आहे. मुलांना घडवण्यासाठी लोकांची मजुरी करून उपजीविका भागविणाऱ्या पालकांना मोठया चिंतेचा विषय बनला आहे. शाळा अगदी रस्त्या लगत असल्यामुळे मुलांबद्दल मनात धडकी बसली आहे. एक तर काम केल्याशिवाय पोट भरत नाही दुसरी गोष्ट म्हणजे



मुलं घरी येईपर्यंत जीवात जिव राहत नाही. आतापर्यंत या ठिकाणी अनेक अपघात घडले असून अनेक वाहनधारकांना याचा फटका सहन करावा लागला आहे.

या हायवे वरील २२ वळणापैकी सुगावचा वळण सर्वात घातक आहे. या ठिकाणी सूचनाफलक सुद्धा लावला नसल्यामुळे वाहन चालक बुचकळात पडतो आहे. वळणाच्या बाजूला नवीन वस्ती निर्माण झालेली आहे. या वस्तीत राहणाऱ्या लोकांच्या मनात कायम भीती निर्माण झाली आहे. कधी धोका होईल हे सांगता येत नसल्याने सध्या नवीन वस्तीमध्ये भीतीचे वातावरण आहे. म्हणून संबंधित प्रशासनाने याकडे विशेष लक्ष घालून हा रस्ता सरळ करावं असे मत सुगाव बु येथील नागरिक व वाहनधारकांनी प्रसारमाध्यमासी बोलताना व्यक्त केलं आहे. शासनाने या बाबीचा विचार करून रस्त्याचं काम लवकरात लवकर करून वाहनधारकांना सहकार्य कराव अशी मागणी सुगाव नगरीतील लोकांनी केली आहे.

# विस्तार अधिकारी वसंत वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात भव्य काव्यप्रकाशन सोहळा संपन्न

## ‘अंतरीचा दरवळ’ व ‘अशी ही राजेश्वरी’ काव्यसंग्रहाचे प्रकाशन; राष्ट्रीय शिक्षण सेवा व युवा चेतना पुरस्कारांचे वितरण

किनवट ।प्रतिनिधी

काव्यमित्र संस्थेच्या वतीने आयोजित भव्य काव्यप्रकाशन सोहळा किनवट पंचायत समितीचे विस्तार अधिकारी वसंत वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली पिंपरी-चिंचवड येथील तारांगण ऑडीटोरियम येथे (दि.१९) रोजी उत्साहात व दिमाखात पार पडला. छत्रपती शिवाजी महाराज व राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमात ज्येष्ठ कवी रामदास तांबे यांच्या ‘अंतरीचा दरवळ’ आणि डॉ. राजेश्वर हेंद्रे यांच्या ‘अशी ही राजेश्वरी’ या काव्यसंग्रहांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून काव्यप्रकाशन सोहळ्याची सुरुवात झाली. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून मराठा सरदार लखोजी जाधवराव यांचे १४ वे वंशज संभाजीराजे जाधवराव, संत साहित्य अभ्यासक विजय बोत्रे तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सभागृहात साहित्यप्रेमी, कवी, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते व विविध क्षेत्रांतील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

अध्यक्षीय भाषणात विस्तार अधिकारी वसंत वाघमारे यांनी सांगितले कि, रामदास तांबे यांच्या ‘अंतरीचा दरवळ’ या काव्यसंग्रहातील ‘निसर्ग आणि गावमाती’ हा भाग विशेष भावणारा आहे. कवीच्या जीवनाशी जडलेले निसर्गनाते आणि गावकुसातील अनुभव या कवितांमधून जिवंत होतात. हा संग्रह रसिकांच्या हृदयापर्यंत पोहोचेल, असा मला विश्वास आहे. डॉ. राजेश्वर हेंद्रे यांच्या ‘अशी ही राजेश्वरी’ या काव्यसंग्रहाविषयी ते म्हणाले, जीवनातील जबाबदाऱ्यांच्या ओझ्याखाली दडलेले विचार जेव्हा शब्दरूप घेतात, तेव्हा त्यातून नव्या जाणिवा निर्माण होतात. या कवितांमधून भ्रामक मोहापेक्षा वास्तव जीवनमूल्यांचा संदेश दिला आहे.

तर अध्यक्षीय समारोप करतांना



विस्तार अधिकारी वसंत वाघमारे यांनी काव्यमित्र संस्थेच्या सामाजिक व शैक्षणिक बांधिलकीचा पुनरुच्चार करत, गौरवाबरोबर जबाबदारीही वाढते. समाजातील गरजूंना अधिक सक्षमपणे सहकार्य करण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे, असे आवाहन केले. या दिमाखदार काव्यप्रकाशन सोहळ्यामुळे पुण्यातील साहित्यवर्तुळात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, काव्यमित्र संस्थेच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

यावेळी राष्ट्रीय शिक्षण सेवा पुरस्कार व राष्ट्रीय युवा चेतना पुरस्काराने सन्मानित मान्यवरांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. प्रभाताई वाघ-भुजबळ, सुनील पांडुरंग शिंदे, प्रल्हाद ओव्हाळ, राजा सोनकांबळे, डॉ. पूजा शंकर बोंबले, डॉ. आरती राऊत, किरण शिंदे तसेच दिपाली सरिता राजेंद्र राऊत यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक काव्यमित्र संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र सगर यांनी केले. सूत्रसंचालन सारिका माकोडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सचिव हारीनाथ कांबळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपाध्यक्ष डॉ. संजय जगताप व राजू पेठे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# बाऱ्हाळी येथे जगद्गुरू नरेंद्रचार्य महाराज यांच्या पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन

मुखेड ।प्रतिनिधी

जगद्गुरु नरेंद्रचार्यजी संस्थान नानिजच्या अंधश्रद्धा निर्मूलन उपक्रमा अंतर्गत जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या बा-हाळी येथे दि.२४फेब्रुवारी रोजी मंगळवारी पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार आहे . जगद्गुरु नरेंद्राचार्यजी संस्थान नानिजधाम च्या वतीने देशासह राज्यात विविध सामाजिक, आरोग्य विषयक , मोफत ईंग्रजी माध्यमातून शिक्षण , मोफत वेद पाठशाळा ,रक्तदान ,मरणोत्तर देहदान ,अवयवदान ,पर्यावरण ,धार्मिक, अंधश्रद्धा निर्मूलन यासारखे विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सूत्राकडून समजते अंधश्रद्धा निर्मूलन या उपक्रमा अंतर्गत बा-हाळी (द.)येथे दि २४ फेब्रुवारी मंगळवारी जगद्गुरु नरेंद्राचार्यजी यांच्या सिद्धपादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन मोठ्या थाटामा माठात होणार असल्याची माहिती संयोजकाकडून मिळाली आहे त्या अनुषंगाने उदगीर रोड भवानी पेट्रोल पंपाच्या पाठीमागे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे सकाळी ८ वाजता शहरातून भव्य मिरवणूकीने पादुका संतपिठावर



स्थापना,गुरुपूजन,उपासक दिक्षा,आरती सोहळा, पुष्पवृष्टी,प्रवचनकाराचे अम्रततूल्य प्रवचन,दर्शन ,सामाजिक उपक्रम असा भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास नांदेड जिल्ह्यसह लातूर येथील भाविक भक्त उपस्थित राहणार असल्याची माहिती समोर आली आहे हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विविध प्रकारच्या समीती गठीत करण्यात आले आहेत.सर्वांना महाप्रसाद ,पार्किंग व्यवस्था ,पिण्याचे शूध्द पाणी,भव्य मंडप उभारणी करण्यात आली आहे. जिल्ह्यातील भाविक भक्तांनी जगद्गुरू नरेंद्राचार्यजी यांच्या बा-हाळी येथील पादुका दर्शन सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन समितीने केले आहे.

# किनवटमध्ये सरस्वती शिक्षण संकुलाचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात

किनवट ।प्रतिनिधी

किनवट येथील सरस्वती विद्या मंदिर इंग्लिश मीडियम स्कूल तसेच सरस्वती शिक्षण संस्था संकुलातील डी.एड. व वरिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे वार्षिक स्नेहसंमेलन कलावती गार्डन येथे उत्साहात पार पडले. कार्यक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व आदिवासी नेते नारायण सिडाम यांच्या हस्ते झाले, तर अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष व्यंकट नेम्मानीवार होते.

डॉ. अनुजा पाटील यांनी



प्रस्तावना केली. यावेळी व्यंकट आयनेनिवार, संस्थेचे संचालक आदिवरद नेम्मानिवार, कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद भंडारे, बी.एड. विभागाचे डॉ. किरण पाईकराव, डी.एड. विभागाचे आनंद सरतापे, इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका श्रद्धा भंडारे व पत्रकार संतोष अनंतवार उपस्थित होते.विद्यार्थ्यांनी नृत्य, गीत, नाटिका, डंबेल्स सादरीकरण, श्लोक पठण तसेच पंजाब, राजस्थान, तेलुगू प्रदेश व महाराष्ट्रातील लोककलेचे सादरीकरण केले. ‘ऑपरेशन सिंदूर’ व ‘नारी-शक्ती’ या विषयांवरील नाट्यप्रयोगांनी विशेष दाद मिळवली.

कार्यक्रमाचे संयोजन श्रुतीमधु मिश्रा व डॉ. रामकिशन चाटे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. तपनकुमार मिश्रा यांनी तर आभार प्रदर्शन वैभव सामनगावे यांनी केले. शिक्षक, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# हिमायतनगर शहरात अवैध धंदे जोमात पोलीस यंत्रणा कोमात ?

हिमायतनगर ।प्रतिनिधी

हिमायतनगर शहरासह ग्रामीण भागात सध्या च्या परिस्थितीत सर्व परिसरात अनेक ठिकाणी चौका चौकात मटका जुगार आणि देशी दारू विक्री जोमात प्रशासन मात्र कोमात असल्याचे दिसते कारण विकणाऱ्यांची संख्या वाढली आहे बहुतांश लोक व्यसनाच्या आहारी गेल्यामुळे त्यांच्या संसारात उध्वस्त होण्याची वेळ अनेक परिवारावर आली आहे ओपन जेऊ दे ना क्लोज झोपू दे ना. मटका जुगार वर देशी




दारू राजरोसपणे चालू आहे पण पोलिसांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष आहे दारूच्या आहारी युवा पिढी जाऊन अतिशय घरादाराचे नुकसान होत आहे अनेकांचे संसार उध्वस्त होत आहे पण दारू विक्री काही कमी होत नाही. देशी दारू चे बॉक्स तर खुले आम बाजारात विक्री केली जात आहेत यामध्ये काही एजंट पण दारू विक्री करत आहेत. या सर्व बाबीवर पोलिसांचे लक्ष असून सुद्धा अर्थपूर्ण दुर्लक्ष पोलीस प्रशासन करीत असल्याचे दिसत आहे तर सर्व सामान्य जनता ह्या गोष्टीवर आळा बसेल का आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी या बाबीकडे लक्ष देऊन हे चालणारे अवैद्य धंदे बंद करून सर्व सामान्य परिवाराचे उध्वस्त होणाऱ्या संसाराकडे लक्ष द्यावे

# सार्वजनिक शिवजन्मोत्स मोठया उत्साहात साजरा

नांदेड ।प्रतिनिधी

दि १९ फेबुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त छावा श्रमीक संघटना ,जिजाऊ प्रतिष्ठाण नांदेड व छ.ढ.ड.-च्या विद्यमाने आयोजीत एस पि ऑफीस समोर डॉ हंसराज वैद्य हॉस्पीटल समोर वजीराबाद चौक नांदेड येथे सर्वजनिक शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला . छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरिक्षक उदय खंडेराय . उपनिरिक्षक पुयड पाटील व समिती अध्यक्ष भास्कर हंबर्डे . स्वागताध्यक्ष अनिल पाटील धमने यांच्या हस्ते पुजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली यावेळी शिवरत्न पुरस्कार . शिवधर्म पुरस्कार . व भव्य अन्नदान वाटप कार्यक्रम राबविण्यात आला तसेच सामाजिक उपक्रमातील सक्रिय सामाजिक कार्यकर्ते यांचा सम्मान सत्कार पुरस्कार देऊन करण्यात आला यावेळी शिवाजी महाराज यांच्या वर भाषण केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गोल्ड मेडल देऊन सत्कार करण्यात आला या कार्यक्रमा प्रसंगी स्थानिक गुन्हे शोध पथकाचे पोलीस निरिक्षक उदय खंडेराय . माजी सभापती सतिष पाटील उमरेकर . डॉ शितल भालके . उपक्रम समिती अध्यक्ष भास्कर हंबर्डे व स्वागताध्यक्ष अनिल पाटील धमने . दिपुसिंघ सोडी . पुजा बिसेन .गंगाप्रसाद काकडे , भाग्यश्री करंदीकर . सुजाता पांपटवार . शंकर धिरडीकर ' प्रा हनमंते सर .उदय सिंह कच्छवा . लक्ष्मीकांत पत्तेवार . संतोष शिंदे यांच्या सह आदी ची उपस्थिती होती . समिती अध्यक्ष भास्कर हंबर्डे व स्वागताध्यक्ष अनिल पाटील धमने यांच्यी वतीने ड यांना दिलीप ठाकुर (शिवधर्म ) सेवा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले माजी जिप सदस्य गंगाप्रसाद काकडे यांना शिवरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले तर शंकर धिरडीकर यांना (शिवरत्न )पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आला तर गजानन गुंडाळे (शिवरत्न ) पुरस्कार, गजानन झार्डे (शिवरत्न ) पुरस्कार यांच्या सह आदी मान्वराचे पुरस्कार देऊन सन्मान सत्कार करून गौरविण्यात आले .

या कार्यक्रमाचे मुख्य आयोजक समिती अध्यक्ष भास्कर हंबर्डे , सौ माधुरी हंबर्डे तर स्वागताध्यक्ष अनिल पाटील धमने डॉ. शितल भालके, हे होते तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेणारे राम पाटील ' संतोष शिंदे . गणेश पाटील ' कृष्णा पवार . वाशीम शेख . आदिनी परिश्रम घेतला आहे .

# विद्रोही साहित्यिकांच्या स्वागतासाठी नांदेड नगरी सज्ज

## २७, २८ फेब्रुवारी व ०१ मार्च रोजी होणार २० वे विद्रोही मराठी साहित्य संमेलन : स्वागताध्यक्ष राहुल प्रधान यांची माहिती

नांदेड : - विद्रोही सांस्कृतिक चळवळ आयोजित व संविधान मूल्यांना समर्पित २० व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली असून २७, २८ फेब्रुवारी व ०१ मार्च रोजी होणाऱ्या या संमेलनासाठी सायन्स कॉलेजच्या सदाशिव पाटील क्रीडा संकुलाच्या मैदानावर उभारण्यात आलेली साहित्य नगरी विद्रोही साहित्यिकांच्या स्वागतासाठी सज्ज झाली आहे, अशी माहिती स्वागताध्यक्ष राहुल प्रधान यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या पत्रकार परिषदेस डॉ. राजेंद्र गोणारकर , डॉ. अनंत राऊत , प्रा. विठ्ठल भंडारे , इंजि .भीमराव हाटकर , राज गोडबोले , इंजि. भारत कानिंदे, विठ्ठल असूरे , कॉ. उज्वला पडलवार , डॉ. विजयकुमार माहुरे आदींची उपस्थिती होती.

संमेलनाच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध कवी लोकनाथ यशवंत (नागपूर) यांची निवड झाली असून उद्घाटक म्हणून हिंदीतील ख्यातनाम समीक्षक डॉ. बजरंग बिहारी तिवारी (दिल्ली) उपस्थित राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून



डॉ. मिलिंद आव्हाड (दिल्ली) यांची उपस्थिती लाभणार आहे.

इंजि. चंद्रशेखर शिखरे, डॉ. रेखा शेळके आणि डॉ. प्रतिभा अहिरे यांच्या अध्यक्षतेखाली तीन स्वतंत्र परिसंवाद आयोजित करण्यात आले आहेत. विशेष आकर्षण म्हणून सुप्रसिद्ध पत्रकार राजू परुळेकर यांचे व्याख्यान होणार आहे.संमेलनात निमंत्रितांच्या कवी संमेलनासह तीन स्वतंत्र कवी संमेलने पार पडणार आहेत. तसेच सुप्रसिद्ध सिने-नाट्य अभिनेते मिलिंद शिंदे (मुंबई )यांच्याशी डॉ. राजेंद्र गोणारकर संवाद साधणार असून त्यांच्या कविताही रसिकांना ऐकावयास मिळणार आहेत.सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत प्रेमानंद गज्वी लिखित ‘घोटभर पाणी’ ही एकांकिका सादर होणार आहे. तसेच ‘मी जनाबाई’ आणि ‘मी सावित्रीबाई फुले’ हे एकपात्री प्रयोगही रंगणार आहेत.याशिवाय सुप्रसिद्ध पत्रकार ज्ञानेश महाराव यांचे ‘शाहिरांचे गणराज्य – लोकशाहीचा सांस्कृतिक प्रवास’ हे संगीत व्याख्यान होणार आहे.संमेलनाच्या पूर्वसंध्येला, म्हणजे दि २७ फेब्रुवारी रोजी रात्री ८ वाजता, पँथर पद्मश्री नामदेव ढसाळ यांच्या कवितांवर आधारित ‘भयंकराच्या दरवाजात कोण’ हे नृत्यनाट्य सादर करण्यात येणार आहे. या प्रभावी कलाप्रयोगाचे दिग्दर्शन पुणे येथील दिग्दर्शक मयूर शितोळे यांनी केले आहे. विद्रोही विचारधारेची काव्यात्मक व रंगमंचीय अभिव्यक्ती असलेला हा कार्यक्रम संमेलनाचे विशेष आकर्षण ठरणार आहे.

संमेलन परिसरात विविध प्रकारच्या चित्रप्रदर्शनाचे कलादालन उभारण्यात आले असून महाराष्ट्रातील विविध प्रकाशनांच्या पन्नासहून अधिक ग्रंथदालनांचा सहभाग असणार आहे.